स.ना.१६०२
पुणें मराठी ग्रंथालय
कादंबरी
क्रमांक— ६६०
६६/६८
014876

# ...ग्विहार.

गुणागोविंद-पुस्तकमाला पु. ९ वें.

नांवें नोंदवा!

आपणांस अभिमान आहेना ?

मग-नांवें नोंदवा.

# श्री शिवाजीमहाराजांचें आरमार.

अथवा

# सांवळ्या तांडेल.

## ( अत्यंत मनोरंजक ऐतिहासिक सचित्र कादंबरी )

आपल्या अतुल पराक्रमानें ज्या थोर आणि अत्यंत वंद्य महापुरुषानें आमचें 'हिंदु' हें नांव कायम ठेविलें त्या 'असन्निवृत्त्यै तदतीतमेव' ह्मणून सर्व महाराष्ट्रवासी जनांस प्रिय आणि संस्मरणीय असलेले **श्री शिवाजीमहाराज** यांचा प्रत्येकाला अभिमान आहेच, ह्मणून प्रत्येकानें त्यांच्या आरमारावर श्रीयुत **नाथ माधव** यांनीं लिहिलेली ही सचित्र कादंबरी अवश्य संग्रहीं ठेवावी. श्रीयुत नाथ माधव यांच्या कादंबऱ्या किती चटकदार आणि बोधपर असतात हें आतां नव्यानें लिहावयास नकोच ! त्यांनीं अनेक ऐतिहासिक पुस्तकांवरून महाराजांच्या आरमाराविषयीं माहिती मिळवून ती कादंबरीच्या रूपानें दिली आहे. ह्या कादंबरीच्या वाचनानें मनाची करमणूक आणि स्वराज्य स्थापनेची मुहूर्तमेढ रोवितांना ज्या निःस्वार्थ व निस्सीम दर्यावर्दी वीरांनीं स्वामिभक्तीसाठीं स्वप्राणाची आहुति दिली त्यांच्या धाष्टर्याचें रोमहर्षण वर्णन वाचून वाचकांच्या डोळ्यांत आपल्या पूर्वजांच्या अभिमानाचे अश्रू येतील. एकंदरींनें कथानक हृदयंगम असून त्यावेळचीं ऐतिहासिक चित्रें आणि कथानकाचा उल्लेख करणारीं चित्रें फारच उत्तम आहेत. पृष्ठसंख्या २०० असून कादंबरी 'अंटिकपेपर'वर छापली आहे. किंमत सव्वा रुपया ट. हा. नि. मे अखेर नांवें नोंदविणारांस सवलतीनें एक रुपाया ट. हा. नि. कादंबरी एप्रिलमध्यें ग्राहकांस मिळेल. त्वरा करा आणि नांवें नोंदवा.

ह्याशिवाय सर्व तऱ्हेचीं पुस्तकें मिळतात. व्यापारी, शाळामास्तर व लायब्ररीचे व्यवस्थापक यांस योग्य कमिशन. अर्धा आण्याचें तिकिट पाठविणारांस क्याटलाग फुकट.

हिंद एजन्सी बुकसेलर्स, पब्लिशर्स,

माधवबाग, मुंबई.

गुणागोविंद-पुस्तकमाला.

पुस्तक ९ वें.

# विविध-वाग्विहार.

संपादक,

बापू बळवंत देवधर.

कि ८६

[ पोष्ट निराळें.

( *All Rights reserved by the Publisher.* )

Printed by V. P. Pendherkar at the Tutorial Press,
3, Charni Road, Girgaon, Bombay.
Published by Bapu Balvant Devdhar,
621, Girgaon, Bombay.

# आश्रयदात्यांस सूचना.

प्रस्तुत पुस्तक हें **गुणागोविंद-पुस्तकमालेचें** या वर्षाचें शेवटचें होय. आज वर्षभर गुणागोविंदकडून झालेल्या प्रयत्नाची वाचकवर्गाकडून बरीचशी चीज केली गेली त्याबद्दल गुणागोविंद त्यांचा फार आभारी आहे. वाचकवर्गाकडून नुसती चीज झाली इतकेंच नाहीं पण हें मोठ्या खर्चाचें कामही त्यांच्या आश्रयामुळेंच आजपर्यंत रेंटलें गेलें. हें नववें पुस्तक आश्रयदात्यांस दिलें गेलें ह्मणजे गुणागोविंदाच्या पहिल्या वर्षासाठीं त्यांच्याकडून आलेल्या वर्गणीची भरपाई झाली. यापुढचें दहावें पुस्तक ह्मणजे **मोहन बाग, भाग दुसरा** हें नव्या वर्षाचें पहिलें पुस्तक होय. तरी आजपर्यंत गुणागोविंदला त्याच्या आश्रयदात्यांनीं वेळोंवेळीं आश्रय देऊन त्याचें पहिल्यावर्षीचें काम जसें निर्विघ्नपणें पार पाडविलें तसें या नव्या वर्षींही आपला आश्रय तसाच कायम ठेऊन नव्या वर्षाचें काम त्याच्याकडून त्यांनीं पार पाडवावें अशी त्याची त्यांस आग्रहाची विनंति आहे.

गुणागोविंद पुस्तकमाला आज एक वर्षाची झाली व तितक्या अवधींत तिनें पहिल्यानें प्रसिद्ध केल्याप्रमाणें आपल्या आश्रयदात्यांस जवळ जवळ पावणेंसातशें बारीक टाईपाच्या छपाईचीं पृष्ठें व पंचवीस सव्वीस खास गुणागोविंदकारितांच तयार करविलेलीं हाफटोनचीं चित्रें इतकीं दिलीं. यापुढेंही आणखी जास्त चित्रें व निरनिराळ्या गमतीचीं निरनिराळी पण बोधपर अशीं पुस्तकें देऊन आपल्या आश्रयदात्यांस खुष करावें व घरोंघरीं 'गुणागोविंद हवाहवा' असें व्हावें अशी गुणागोविंदच्या मनांत फार इच्छा आहे, पण लहान मुलाला तें जसजसें मोठें होऊं लागतें तसतसें त्यास खाणेंपिणेंही जास्त जास्त लागतें; त्याप्रमाणेंच गुणागोविंदनें जास्त मजल मारायची ह्मणजे त्याची शक्तिही अधिक वाढली पाहिजे व ती वाढविणें सर्वस्वी आश्रयदात्यांच्या हातांत आहे. ही गोष्ट ह्मणजे त्यांना कांहीं

जड आहे असें नाहीं तर **प्रत्येक आश्रयदात्यानें आपल्या मित्रमंडळीपैकीं निदान एकेक तरी नवा आश्रयदाता गुणागोविंदला मिळवून दिला तर गुणागोविंदला योग्य तितकें पोषण मिळून त्याला आपल्या आश्रयदात्यांचें मनोरंजन मोठ्या आनंदानें व सहज करितां येईल.** आश्रयदातेही या आपल्या विनंतीला खास मान देऊन आपल्याला प्रोत्साहन देतील अशी गुणागोविंदला पण बळकट आशा आहे.

गेल्यावर्षाप्रमाणें नव्या वर्षाची वर्गणी रुपये २॥ ही आश्रयदात्यांकडून नवें पुस्तक प्रसिद्ध होण्यापूर्वीं किंवा त्याच्या बरोबर ह्मणजे आगाऊ यावयाची. तरी रोखीनें अगर मनीआर्डरनें ज्यांनां ती पाठविणें असेल त्यांनीं ती येत्या ता. १८ मे पूर्वीं गुणागोविंद ऑफीसमध्यें भरावी अगर मनीऑर्डरनें पाठवावी. या तारखेपर्यंत ज्यांच्याकडून वर्गणी येणार नाहीं अगर पुढल्या वर्षीं गुणागोविंदाला आश्रयदाते राहणें नाहीं असें कळविण्यांत येणार नाहीं त्यांजकडे येत्या वर्षाचें पहिलें पुस्तक **मोहनबाग, भाग दुसरा** हें त्या वर्षाच्या वर्गणीपुरत्या **रुपये अडीचच्या व्ही० पी० नें** पाठविण्यांत येईल. त्या व्ही० पी० चा आश्रयदात्यांनीं कृपाळूपणें स्वीकार करावा ही त्यांस गुणागोविंदची विनंति आहे.

# येत्या वर्षीं गुणागोविंद–पुस्तकमाला

**मोहनबाग भाग २ रा व ३ रा;** बायको कीं पुरुष! **भाग १ ला व २ रा; विविध–वाग्विहार एक दोन** हीं व यांशिवाय आणखी तीन चार मनोरंजक बोधप्रद, नीतीमार्गदर्शक व अध्यात्मिक विषयांवरील अशीं पुस्तकें **व चालू वर्षापेक्षां जास्त चित्रें** आपल्या आश्रयदात्यांस देऊन **त्यांस चांगल्या तऱ्हेनें रिझवील.**

# दोन शब्द.

रुचिवैचित्र्य हें व्यक्तिमात्राला आहे. आणि तें आहे ह्मणूनच या जगांत आपण ज्या कांहीं नानाविध वस्तू पाहतों त्या निर्माण झाल्या आहेत, व रोज रोज नव्या नव्या आणखी होत आहेत. याच्यामुळेंच जगाला रोज नवें नवें मोहक स्वरूप येत आहे. आणि याच्यामुळेंच आज जगाची जी उन्नति आपण पाहतों ती पण होत आहे. सारांश, सगळेंच जग यांतच गुरफटलें आहे असें ह्मटलें तरी कांहीं प्रत्यवाय येईल असें वाटत नाहीं. अशी वस्तुस्थिति असतांना गुणागोविंदचे वाचक त्यापासून निर्लेप राहतील हें कसें होणार ? नाहींच. आजपर्यंत गुणागोविंदचीं आठ पुस्तकें प्रसिद्ध झालीं तीं बहुतेक प्रत्येक अगदीं निरनिराळ्या तऱ्हेचें प्रत्येक अशींच आहेत; तरीपण निरनिराळ्या लेखकांचे लेख व कविताही मधून मधून गुणागोविंदांत याव्यात अशी त्याच्या आश्रयदात्यांपैकीं पुष्कळशा मंडळींची इच्छा दिसली. त्यावरून गुणागोविंदनें आपल्या लेखक मित्रमंडळीस विनंति केली. व त्यांनींही ती कृपाळूणानें मान्य केली. त्यामुळें आपल्या आश्रयदात्यांची इच्छा थोडी-बहुत तरी तृप्त व्हावी या हेतूनें असल्या निरानिराळ्या व मान्य लेखकांनीं विभूषित असें हें मालेचें नववें-चालू वर्षाचें शेवटचें-गद्यपद्यात्मक पुस्तक गुणागोविंद आपल्या वाचकांस सादर करीत आहे त्याचा ते गुणागोविंदानें स्वीकार करतील अशी अशा आहे.

प्रकाशक.

# अनुक्रमणिका.


| | | | |
|---|---|---|---|
| दिव्य गान ( कविता ) ... | १ | इंग्लंडमधील श्रीमंतांची राहणी | ३६ |
| मानिनी कविते ! (कविता) ... | २ | मृदुलामृणालगीत ( कविता ) | ४१ |
| कविकावितांना निंदूं नका. (कविता) | ३ | वासवदत्ता आणि उपगुप्त ... | ४५ |
| डेली युनिव्हर्स-दैनिक विश्व (गोष्ट) | ४ | विरहिणीची मदन निर्भत्सना ( कविता ) ... ... | ५३ |
| आनंदाचें गणीत (कविता) ... | १७ | पतितोद्धारक ( कविता ) ... | ५४ |
| वसंत ( कविता ) ... ... | १८ | सोनें पैशाला शेर झालें तर... | ५५ |
| गुलाबाचा आत्मवृत्तांत ... | १९ | प्रेमगीति ( काव्य ) ... | ५७-६२ |
| बुद्ध बोध ( काव्य ) ... ... | २२ | | |



पुढील पुस्तक.

# मोहनबाग, भाग दुसरा.

येत्या नरसिंहजयंतीच्या आंतबाहेर प्रसिद्ध होईल.

# विविध वाग्विहार.

## दिव्य गान.

पद.

निशिदिनीं जयाचें वेड लागलें भारी ।
तें गान ऐकतों दिव्य रुचिर सुखकारी ॥ धृ० ॥
मृदु तीव्र चहुंकडे निघती ज्याचे सूर ।
स्थिरचरीं, भूदरीं, वरी, अंबरीं दूर ॥
हें हीन, कृष्ण, सुकलेलें ।
हें शुभ्र, नवें, खुललेलें ।
हें शांत, शुद्ध, नमलेलें ।
हा भेद न ज्या, जें सृष्टि व्यापी सारी ॥
तें गान ऐकतों दिव्य रुचिर सुखकारी ॥ १ ॥
नव पुष्पासंगें गातें पिकलें पान ।
पिक गातां मारी तान सर्वं उद्यान ॥
जननीचीं ' जो जो ' गाणीं ।
गातसे शिशूची वाणी ॥
खाणीस सूर दे पाणी ॥
मणि 'सा' ह्मणतां 'री' कोळसाहि उच्चारी ।
तें गान ऐकतों दिव्य रुचिर सुखकारी ॥ २ ॥
दिन गातो, गाते रात्र, तारका गाती ॥
गातात इंद्रधनु मेघ विजेसांगाती ॥
प्रति पदार्थ लागे गाया ।
ती गाते त्यांची छाया ।
गायकचि तान ऐकाया ।
मजमधेंहि उठवी तरंग जे निर्धारीं ।
तें गान ऐकतों दिव्य रुचिर सुखकारी ॥ ३ ॥

कोल्हापूर. —सुमंत.

# मानिनी कविते !

पद्-' उद्यां वध जातें० ' ही-चाल.

मानिनी कविते, । तवस्थान कुठें ? दाखवि तें ॥ ध्रु० ॥

वससी सुंदर गिरिगुहभुवनीं ।
अथवा निर्जन ऐशा विपिनीं ।
प्रासादावरि अथवा गगनीं ।
घेशि तानेतें । तंव कोण तुजसवें येतें ॥ मानिनी० ॥ १ ॥

वनिंचा सौरभ सकळ लुटाया ।
जाशि किं मधुपासवें फिराया ।
तो तुज कृष्णहृदयीं त्या ठायां ।
रमवी नेटे । का अन्य कुणी तुज भेटे ॥ मानिनी० ॥ २ ॥

जाशी कधिं वेश्यांमागोनी ।
विप्रांवरि कधिं खुष होवोनी ।
शूद्रगृहीं कधिं असशी रमोनी ।
खरें तव नातें । मज कांहिं गे कळेना तें ॥ मानिनी० ॥ ३ ॥

का तुज जातीबंधचि नाहीं ।
उच्च नीच हा भेद न कांहीं ।
अज्ञ सूज्ञ का सम तुज पाहीं ।
कुण्या रमणातें । तूं धरिसि अपुल्या हातें ॥ मानिनी० ॥ ४ ॥

विद्वत्ता कीं तुज आवडते ।
अथवा निर्मळ हृद तुज धरतें ।
कीं तव धर्मीं प्रीति जडते ।
कशा रसिकातें । निज प्रसाद देशी माते ॥ मानिनी० ॥ ५ ॥

शब्दकोशिं का तूं गे वससी ।
अलंकारशास्त्रीं सांपडशी ।
यतियमकास्तव रुसुनी बससी ।
खरें सुखदातें । तव स्थान कुठें दाखविं तें ॥ मानिनी ॥ ६ ॥

आगर. —सि. मा. लोंढे.

# ' कविकवितांना निंदु नका ! '

पद--" त्रिखंड धुंडुनि०" ही--चाल.

वंदा निंदा कुणि कवितें । कवि न विसंबिल परि कविते ॥
कवि आणि त्याची कविता । याविण काळ न एक रिता ॥
कविंचीं कवनें ।
दैवी सुमनें ।
अपूर्व स्फुरणें ।
कवि अर्पी प्रेमें रसिकां । हेतु तयाचा शुद्ध निका ॥ १ ॥
अवरोधी कविकार्यातें । असा कुणी न दिसे मातें ॥
कविची काव्यमयी दृष्टि । जेथ तेथ रचि नव सृष्टि ॥
क्षणांत इकडे ।
क्षणांत तिकडे ।
सदा चहुंकडे ।
विहार करतें कविमन तें । विराम ठाउक न तयातें ॥ २ ॥
दिधले देवें चक्षु जरी । सर्व पाहती वरी वरी ॥
कवि एकचि तो आंत शिरे । सत्य तत्व त्या ह्मणुनि स्फुरे ॥
क्षुल्लक वस्तु ।
निर्जीव किंतु ।
दैवी हेतु ।
प्रगट करि जो गूढ जनीं । कवि जगतीं हो महामुनी ॥ ३ ॥
अन्नवस्त्र धन असो नसो । जनीं असो वा वनीं फसो ॥
सदा वाहिनी जशि सरिता । अखंड तशि कविची कविता ॥
हात जोडतों ।
पदर पसरतों ।
अति विनवीतों ।
कविकवितांना निंदु नका । बोधामृतमाधुरि चाखा ॥ ४ ॥

कराची. —बा. जि. हडकर.

# डेली युनिव्हर्स-दैनिक विश्व

ऊर्फ

## इहलोकचा चित्रगुप्त.

सकाळचे आठ वाजण्याचा सुमार! साप्ताहिक विश्व पत्राचे संपादक श्रीयुत दामूआण्णा यांचें नुकतेंच आलेलें ताजें टपाल वाचून झालें होतें व बाहेर जाण्याकरितां ते कपडे घालीत होते. पोषाख होतो न होतो तोंच त्यांच्या पत्नींनीं चहाचा कप आणून टेबलावर ठेवला. दामूआण्णा लागलेच खुर्चीवर बसले व चहा घेऊं लागले, तोंच एक नोकर (बॉय) कोणाचें व्हिजिटकार्ड घेऊन आला, त्याला पाहतांच त्यांच्या पत्नी मर्यादेच्या रीतीप्रमाणें आंत निघून गेल्या.

"**श्रीयुत चित्रगुप्त.**" व्हिजिट कार्डावरील हें नांव वाचतांच हे गृहस्थ कोण असावेत ह्मणून दामूआण्णा विचार करूं लागले. नांवावरून ओळख पटली असती तर आतां दामूआण्णांनीं त्यांस परभारेंच वाटेस लाविलें असतें. कारण आतां त्यांना फार जरूरीच्या कामास जावयाचें होतें. परंतु नांवावरून गृहस्थ अपरिचित वाटल्यानें 'त्यांना आंत पाठवून दे' असें त्यांनीं मुलास सांगितलें.

मुलगा बाहेर गेला. चहा घेऊन झाल्यामुळें दामूआण्णाही उठून डोक्यावर पगडी व डोळ्यांवर चष्मा चढवून एकीकडे बूट वगैरे घालूं लागले. तोंच श्री० चित्रगुप्त आंत आले व त्यांनीं दामूआण्णांस नम्रपणानें नमस्कार केला.

**दामू०**-यावें, यावें. आपण कोण, कोठून, कशाकरितां आलां?

**चित्र०**-मी एक नवी स्कीम (योजना) तयार केली असून ती आपणांस दाखवावयाची आहे.

**दामू०**-होय का? पण मला आतां वेळ नाहीं. याबद्दल क्षमा करा. आजच्या आजच माझ्या भेटीची उत्सुकता असेल तर साडेदहांच्या सुमारास लायब्ररींत या. मी त्यावेळीं आपणांस तेथें भेटूं शकेन.

**चित्र०**-मग आपली भोजनाची वेळ होणार.

**दामू०**-होय. पण हरकत नाहीं. आपली मुलाखत झाल्यावर मग सावकाशीनें मी घरीं येईन.

**चित्र०**-ठीक आहे. मी तेथें आपली वाट पहात बसतों.

**दामू०**-बरें; या. नमस्कार.

चित्रगुप्त नमस्कार करून निघून गेला. दामूआण्णाही एकदा आरशांत तोंड पाहून बाहेर पडले व आपलें काम होतें त्या रस्त्यास लागले.

[ २ ]

अनेक एजंट किंवा दलाल नेहमीं येत असतात त्यांतलेच हे एक असतील अशा समजुतीनें दामूआण्णांनीं या चित्रगुप्तासंबंधानें विशेष विचार केला नाहीं. त्यांना आपलीं योजलेलीं कामें उरकतां उरकतां कल्पनेपेक्षां जास्त वेळ लागला. सुमारें साडेअकरा वाजून गेले होते. आपण ज्याला साडेदहांचा शब्द दिला होता तो गृहस्थ कदाचित् आपली वाट पहात ताटकळून शेवटीं निघून गेला असेल असेंही त्यांना वाटलें; तरीपण जातांना लायब्ररीवरूनच जावें म्हणजे कदाचित् तो तेथें अजून असल्यास भेटेल या विचारानें ते लायब्ररींत आले.

तो गृहस्थ तेथेंच दामूआण्णांची वाट पहात बसला होता. दामूआण्णांस पहातांच त्यानें उठून पुढें होऊन त्यांस नमस्कार केला. दामूआण्णांनींही त्यास उलट नमस्कार केला व त्यास घेऊन ते मागल्या पडसाळींत एका बांकावर येऊन बसले.

**दामू०**—मला उशीर झाल्यामुळें आपल्याला फार वेळ ताटकळावें लागलें असेल.

**चित्रगुप्त**—हो. पण आपलें तरी महत्वाचेंच काम होतें. तो यंत्र दुरुस्त करणारा न भेटतां तर आपलें काम अटकलें असतें. नगरशेटाकडे गेला नसतां तर आजची हुंडी खोटी होऊन दुपारीं कारखान्याच्या पगाराची पंचाईत पडली असती- कलेक्टरसाहेब भेटले नसते तर सहा सातशें रुपायांचें छापकाम दुसरीकडे गेलें असतें...

चित्रगुप्ताची ती गोष्टीची सांखळी एकामागून एक लांबतच चालली. आपण जेथें गेलों व जीं जीं कामें केलीं त्यांची अगदीं तपशीलवार हकीकत हा सांगतो हें पाहून दामूआण्णा चकितच होऊन गेले. हा कोणी लफंगा बिफंगा आहे कीं काय असाही त्यांना संशय आला व त्याच्याकडे संशयपूर्ण दृष्टीनें ते पाहूं लागले.

**चित्रगुप्त**—आपल्या मनांत संशय आला आहे. पण तो चुकीचा आहे. मी डिटेक्टिव्ह किंवा सोनेरी टोळींतला कोणी असा मुळींच नाहीं. मीं जी स्कीम ( योजना ) बसविली आहे तिच्यांतली ही थोडीशी झुळुक दाखविली !

**दामू०**—आपली स्कीम कसली आहे ?

**चित्रगुप्त**—मीं एक जगाच्या बातम्या पुरविणारी युनिव्हर्सल न्यूज् एजन्सी तयार केली आहे. जगांत ठिकठिकाणीं माझे बातमीदार नक्की केले

आहेत व त्यांच्याकडून मला चोहोंकडच्या–अगदीं गुप्त गुप्त ठिकाणच्या देखील–बातम्या मिळूं शकतात. हल्लीं त्याची तालीम चालू आहे. त्या प्रयोगांतच आपली सर्व बातमी मला कळली. खोटी असल्यास सांगा.

दामू०—नाहीं. सर्व गोष्टी अक्षरशः खऱ्या आहेत.

चित्र०–हें माझें सर्व नोटबुक आपल्याजवळ ठेवा. यांत नुकत्याच आलेल्या ताज्या बातम्या आहेत. या फार तर उद्यां परवां इतर पत्रांतून प्रसिद्ध होतील. यावरून मला बातम्या किती लवकर मिळतात हें आपल्या ध्यानीं येईल.

दामू०–बरें; पण पुढें तुमचें म्हणणें काय आहे ?

चित्र०–तें मग पुढें. आधीं माल पारखून घ्या अशी माझी विनंति आहे.

यानंतर तो उठलाच. दामूआण्णांना त्या बैठकीस त्यानें पुढें बोलूं दिलें नाहीं.

[ ३ ]

दामूआण्णा टांचणांची वही घेऊन घरीं आले. एक, दोन, तीन दिवस झाले. रोज त्यावरून ते इतर पत्रांतील बातम्या मिळवून पहात होते. चित्रगुप्तही रोज येऊन आपल्या बातम्यांचा ताजेपणा सिद्ध करून दाखवून आपल्या 'युनिव्हर्सल न्यूज एजन्सी'च्या स्कीमची योग्यता दामूआण्णांच्या मनावर ठसवीत होता. शेवटीं या एजन्सीचे आपण ग्राहक व्हावें असें त्यांच्या मनानें घेतलें व त्या उद्देशानें ते त्याच्याशीं बोलूं लागले.

दामू०–बरें तर मग आपल्या टर्मस् ( अटी ) सांगा. आह्मी आपले एक ग्राहक होण्यास तयार आहों.

चित्र०–मी ग्राहक मिळविण्यासाठीं फिरत नाहीं. मला माझें स्वतःचें पत्र काढून त्याला या स्कीमचा लाभ देण्याची इच्छा आहे. त्यांत आपण मला भागीदार व्हाल काय ?

दामू०–हो हो: मोठ्या खुषीनें होईन असल्या ताज्या व महत्वाच्या बातम्या देणारें पत्र आपण सुरू केलें तर चांगलेंच किफायतशीर होईल. आणि त्यापासून सरकारला व लोकांनाही फार फायदा होईल.

झालें उभयतांची गट्टी जमली. दामूआण्णांना आपला द्रव्याचा योग जवळ आला असें वाटलें. धंद्यासंबंधानें उभयतांच्या अटी नक्की झाल्या. दामूआण्णांचें कसें बसें चाललेलें साप्ताहिक विश्व पत्रच दैनिक विश्व करावें असें उभयतांच्या मतानें ठरलें. हस्तपत्रकांचे मसुदे उभयतांचे मतानें तयार झाले. छापखाना दामूआण्णांचा होताच; तथापि कांहीं चालूपुरतें नवीन सामानही मागविण्यांत

आलें. तिसऱ्या कोणासही कसला मागमूस लागूं न देतां सर्व बेतापुरती तयारी हां हां ह्मणतां झाली व पाडव्याच्या मुहूर्तानें हस्तपत्रकें प्रसिद्ध करण्यांत आलीं.

[ ४ ]

## वाचा, वाचा !

### साप्ताहिक विश्वपत्र दैनिक होणार !

**" जगांतील सगळ्या ठिकाणची, सगळ्या लोकांची, सगळ्या प्रकारची बातमी ! जगभर खास बातमीदार ! अगदीं कानाकोपऱ्यापर्यंतच्या माहितीची ताजी खबर ! घरबसल्या सगळ्या जगाची हालहवाल ! थोडा दाम, मोठें काम ! बहुश्रुतपणाचें अपूर्व साधन ! व्यापाराला व उद्योग-धंद्याला विलक्षण साहाय्य ! त्वरा करा व वर्गणीदार व्हा ! असलें साहस आजपर्यंत कोणीं केलें नाहीं पुढेंही कोणी करणार नाहीं. " इ०**

हुषारनगरासारखें गांव, त्यांत दामूआण्णासारखे साधारण मनुष्य संपादक ह्मणून पुढें आलेले, त्यांचे पत्र-तेंही साप्ताहिक नव्हे तर दैनिक व त्याचें प्रसिद्धिपत्रक वर दिलेल्या तऱ्हेचें ! मग काय गांवच्या मंडळींना कांहींएक अटकळ होईना. बाहेर गांवच्या मंडळींत मात्र, जाहिरातीच्या द्वारें ही बातमी प्रसिद्ध होतांच, मोठी बोलवा सुरू झाली. जो तो आपआपल्या मंडळींत यासंबंधाच्याच गोष्टी करूं लागला. हं हं ह्मणतां कांहीं वर्तमानपत्रांतून बातम्यांच्या सदरांत दामूआण्णा संपादक व त्यांचे दैनिक विश्व यांचें वर्तमानसार झळकूं लागलें. साधारण पत्रांचें एवढेंच कर्तव्य असतें; पण कांहीं पत्रकार नुसत्या जाहिरातींतील शब्दांचाच च्छल करून टीका करीत असतात व या टीकांना कित्येकदां चांगल्या चांगल्या नामांकित पत्रकारांचीही प्रेरणा असते. ते परभारें कळ लावून देऊन स्वतः दुरून गंमत पहात असतात. असलाही कांहीं प्रकार या नवीन पत्रासंबंधानें चाललेल्या टीकांत होताच; पण दामूआण्णा ह्मणतात, " ठीक आहे; पत्राचा अंक तर बाहेर पडूं द्या. "

[ ५ ]

ठरल्या दिवशीं 'दैनिक विश्वाचा' पहिला अंक प्रसिद्ध झाला. पत्राच्या शिरोभागींच मोठ्या जाड अक्षरांत वाचकांना इषारत ही कीं, " बातम्या उष्ट्या आहेत कीं अगदीं नवीन आहेत हें वाचकांनीं पाहून घ्यावें. सर्वांत ताज्या बातम्या देण्यांत पहिला नंबर अशीं जीं आज इतर दैनिक पत्रें विद्यमान आहेत, त्यांच्याशींही आमच्या या पत्राची तुलना करून पहावी.

आह्मीं ज्या बातम्या छापल्या आहेत त्या अगदीं ताज्या असून त्यांची इतर कोणत्याही पत्रांस अद्यापि दाद नाहीं. यांतील बातम्या त्यांच्या दुपारच्या किंवा उद्यांच्या अंकांत येतील व कांहीं बातम्या तर त्यांना मिळणेंच शक्य नाहीं ! ”

दैनिक विश्वांतील या शिरोलेखानें वाचकवर्गाच्या निरीक्षण बुद्धीस एकप्रकारचें चांगलेंच वळण मिळालें. कित्येकांनीं इतर पत्रांशीं यांचें पत्र मिळवून पाहिलें तों गोष्ट अगदीं संपादकांनीं आपल्या शिरोलेखांत लिहिली होती तश्शीच! इतर जुन्या दैनिकांचा मान हळुं हळुं कमी होत चालला. व दैनिक विश्वाची प्रतिष्ठा वाढूं लागली. ताजी बातमी पाहिजे असेल तर ‘ दैनिक विश्व’च घ्यावें, असें सर्वतोमुखीं होऊन गेलें।’

निव्वळ बातम्यांचें पत्र या नात्यानें कां होईना, पण दामूआण्णाचें हें पत्र आपल्या ‘दैनिक विश्व’ या नांवाप्रमाणें खरोखरीच महत्वाची कामगिरी करूं लागलें. किर्लोस्करांच्या रामराज्यवियोगांत प्रवेश कसला ? तर ह्मणे दशरथ राजाच्या दरबाराचा. पण दरबारांत–त्या नाटकी दरबारांत माणसें किती ? तर मोजकीं साडेतीन–दशरथ, वसिष्ट, सुमंत व चोपदार! दैनिक विश्व तरी कागदीच होतें; तरीपण तें असें नांवांपुरतें नाटकी विश्व नव्हतें. त्यांत विश्वांतील सर्व ठिकाणच्या सर्व लोकांची सर्व प्रकारची बातमी–तीही सटरफटर किंवा गटार बातमी नव्हे तर अत्यंत महत्वाची आणि पुन्हां शिळपट नव्हे तर अगदीं ताजी! इतकी ताजी कीं इतर पत्रांच्या दोन दोन तीन तीन दिवस अगोदर!

यामुळें दैनिक विश्व घरोंघरीं खेळूं लागलें. नवीन नवीन बातम्यांच्या योगानें परदेशांतूनही त्याचा अतोनात प्रसार वाढला. अनेक वर्तमानपत्रवाले ‘बातम्या द्याल काय’, ह्मणून यांच्याशीं लाडीगोडी लावूं लागले. कित्येक ‘निदान तुमच्या बातम्यांचीं रद्दी टांचणें तरी तुमचें काम झाल्यावर आह्माला देत चला,’ असेंही ह्मणूं लागले.

[ ६ ]

अशा रीतीनें दैनिक विश्वाची कल्पनेबाहेर भरभराट झाली. तें बजावून राहिलेली कामगिरी पाहून जो तो तोंडांत बोट घालूं लागला. कांहीं दुसऱ्या दैनिकवाल्यांनीं आपल्या बातमीदारांस ‘दैनिक विश्व पत्राला प्रत्येक बातमी अगदीं लवकरच पोंहोंचत असून तुमच्या कडून बातमी येण्यास उशीर कां होतो ?’ असें खडसून विचारलें; परंतु ‘बातमी मिळविण्याच्या मार्गांत व ती

मिळविल्यावर पाठविण्यांत आमच्याकडून मुळींच दिरंगाई होत नाहीं' असाच त्यांना सर्वांकडून जबाब मिळे. बातमी पाठविणाऱ्या इतर एजन्सींनाही त्रास होऊं लागला. कारण बहुतेक चांगलीं चांगलीं पत्रें दैनिक विश्वकर्त्यांस ते मागत तेवढे पैसे कबूल करून दैनिक विश्वाच्या बातमीखात्यांतूनच बातम्या विकत घेऊं लागलीं. ज्यांना अशा बातम्या विकत घेणें शक्य नसतें ते प्रचलित मुख्य पत्रांतून बातम्या घेऊन शब्दरचना बदलून आपल्या पत्रांत घेतात व लौकिका-साठीं उगीचच 'आमच्या खास बातमीदाराकडून' असें वर हेडिंग घालतात. पूर्वीच्या सर्व मुख्य मुख्य पत्रांचा हा मान दैनिक विश्वाकडे आला. बहुतेक लहान सहान पत्रें त्याच्या आधारानें आपला धंदा रेटूं लागलीं. अशा रीतीनें दैनिक विश्व सर्वांचें मायपोट होऊन बसलें.

तथापि पुष्कळांच्या मनांत दैनिक विश्वाची ही भरभराट डाचूं लागली. त्यांनीं दैनिक विश्वाचे बातमीदार फोडण्याचा निश्चय केला. पण ते बातमीदार कोण याचा त्यांना कांहीं एक पत्ताच लागेना. दैनिक विश्वांत यासंबंधाच्याही बातम्या येऊं लागल्या. मग काय ? भिंतीला कान असतात व आढ्याला डोळे असतात या म्हणी खऱ्या आहेत कीं काय असा सर्व प्रतिस्पर्ध्यांना भ्रम पडला. दैनिक विश्वाचें कार्यालय म्हणजे इहलोकच्या चित्रगुप्ताची कचेरीच असें सर्वांना वाटूं लागलें. गुन्हेगारांस व सोद्या लफंग्यास मोठी दहशत बसली.

सरकारला न्यायाच्या कामीं मदत होऊं लागल्यामुळें अधिकारी वर्गाकडूनही दैनिक विश्वाचा चांगला पुरस्कार होऊं लागला. दामूआण्णांचें वैभव वाढलें. ठिकठिकाणचे लोक दामूआण्णांच्या भेटीस येऊं लागले. जेव्हां पहावें तेव्हां दामूआण्णांचा वाडा गजबजलेलाच असायचा !

प्रतिस्पर्धी मंडळी मनांत अगदीं जळफळून राहिली होती. दैनिक विश्वाचा डोळा जरी चोहोंकडे फिरून राहिला होता, तरी त्याची पापणी लवेल केव्हां व आपणास त्याच्या नाशासाठीं कांहीं करतां येईल केव्हां यासाठीं ते अगदीं टपून बसत असत व तेवढ्यांत आपल्याच्यानें काय होईल तें उरकून घेत. पण अशानें काय होणर?

[ ७ ]

तरी पण वेळ आली म्हणजे कांड्याचाही नायटा होतो आणि यःकश्चित् मुंगीनेंही हत्तीचा प्राण जातो. दैनिक विश्वाचीही शेवटीं तशीच अवस्था झाली.

आज दैनिक विश्वाच्या परिसमाप्तीचा दिवस ! संपादक दामूअण्णांच्या


सद्दीला आज ग्रहण लागावयाचें होतें. परंतु ही सर्व तयारीही दैनिक विश्वाच्या नकळत अवचित कोठें एकादें निमिष सांपडेल त्यांतच मोठ्या सावधगिरीनें त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांकडून चालली होती. एवढी निमिषायुषी गोष्टही दैनिक विश्वापुढें छपलेली राहणें शक्य नव्हतें व त्याप्रमाणें ही गोष्टही त्यास कळली. परंतु हातचा बार निघून गेलेला होता.

आजच्या दैनिक विश्वाचे ताजे अंक बाजारांत विकण्यास व गांवांत ग्राहकांना वांटण्यास नुकतेच बाहेर गेलेले होते व दामूआण्णा आपलें काम आटोपल्यामुळें नुकतेच मुलाखतीच्या वाड्याच्या पायऱ्या चढत होते. तोंच इकडे दैनिक विश्वाच्या बातमीखात्याचा संपादक एडिटर "अरे अरे! घात झाला! धांवा लवकर. व अंक घेऊन गेलेल्या पोरांना अंक तसेच परत घेऊन बोलवा" असें ह्मणून धांदल करूं लागला. व 'चला चला, सर्वजण जा व निरनिराळ्या रस्त्याकडे जाऊन मुलांना गांठा." अशी ओरड करीत प्रेसमधून बाहेर पडला. छापखान्यांतली बहुतेक मंडळी आधींच निघून गेली होती. पण राहिली साहिली मंडळी होती ती लागलीच चोहोंकडे धांवत सुटली. पण उपयोग काय? मुलांनीं 'अर्धे अधिक अंक विकले व वाटले ह्मणून सांगितलें तेव्हां सर्वजण परत प्रेसकडे धांवले. हा काय गोंधळ आहे ह्मणून पाहण्याकरितां गांवचे लोकही त्यांच्या मागोमाग धांवले.

पण प्रेसपाशीं येऊन पाहतात तों काय? सरकारी शिपायांच्या एका मोठ्या टोळीनें प्रेसच्या इमारतीभोंवती गराडा दिलेला होता. धांवत आलेली मंडळी भयभीत होऊन तशीच दामूआण्णांना ही खबर देण्यास गेली. पण तिकडेही आधींच सरकारी शिपाई त्यांस पकडून घेऊन गेले होते. तिसरी एक टोळी बातमीखात्याच्या संपादकांना पकडण्यासाठीं सुटली होती. पण ते सांपडले नाहींत! ते आधींच फरारी झालेले होते!!

[ ८ ]

लोकांना कसलीच अटकळ होईना. दैनिक विश्वासारखे राजमान्य झालेलें पत्र आणि तेथें सरकारी शिपायांची धामधूम ह्याचा कार्यकारण भाव, संबंध त्यांना कांहींच जुळवितां येईना. "कांहीं राजद्रोहाची वगैरे शंका घ्यावी तर पत्र निव्वळ बातम्यांचें. बरें, बातम्यांत कांहीं चूक झाली असेल अशी कल्पना करावी तर त्या चुकीसाठीं फार तर दामूआण्णांना अधिकाऱ्यांनीं बोलविलें असतें कारण त्यांचें वजन कांहीं असें तसें नव्हतें. बरें कांहीं दुसरें किटाळ असेल



दैनिक विश्वाच्या बातमीखात्याचे संपादक एडिटर–अरे, अरे! घात झाला! धांवा लवकर.

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब, नारायण पेठ, पुणे २

पुणे मराठी ग्रंथालय
४३० क, नारायण पेठ, पुणे २

ह्मणावें तर दामूआण्णांच्या हातून वेडेंवांकडें कृत्य होण्याचा स्वप्नांतही संभव असणें शक्य नव्हतें." असें सर्व ह्मणत.

आणि खरोखर दामूआण्णा फारच सालस गृहस्थ. सरकारच्या मनांत त्यांच्याविषयीं केव्हांही संशय येणें शक्य नव्हतें. संपूर्ण अधिकारी वर्गाची त्यांच्यावर बहाल मर्जी होती. सर्वांशीं ते मिळून असल्यामुळे त्यांच्या सर्वांच्या सूचनांचा त्यांना लाभ मिळत असे. परंतु एकाद्याविषयीं आपलें कांहींही मत असलें तरी कायद्याच्या शिस्तीप्रमाणें त्याच्या विरुद्ध जर एकादें प्रकरण पुढें आलें तर आधीं समोर आलेल्या कागदाप्रमाणें सर्व अंमलबजावणीचा हुकूम देणें भाग असतें. आरोपी या नात्यानें सर्व सोहळे व्हावेच लागतात. विशेष विचार, चौकस तपासणी वगैरे प्रश्न न्यायाचे वेळीं. प्रथम कायदा आणि कायद्याप्रमाणें त्याची अंमलबजावणी !

अधिकाऱ्यांपुढें हें प्रकरण आलें तेव्हां त्यांनीं आपल्याकडून काय घ्यायचा तो संशय घेतलाच. नाहीं असें नाहीं. पण करतात काय ? फिर्यादीला त्याच्या हक्काचा लाभ दिलाच पाहिजे; ह्मणून त्यांनीं वारंट दिलें. तरी पण या भानगडी होताहेत तों दरम्यान दामूआण्णाला यासंबंधाची खबर देण्याकरितां कांहीं गृहस्थही छापखान्याकडे जाऊन पोहोंचले होते. पण छापखान्यांमधील लोक बाहेर धांवलेले, बातमीखात्याचे संपादकही छापखान्यांत नसलेले, त्यामुळें तो प्रयत्न फुकट गेला. कांहीं दामूआण्णाकडेही लागलेच गेले होते पण ते मंडळींत बसलेले ! त्यांना युक्तीनें उठवून एकीकडे आणून खबर देण्यांत व पुढें इकडे तिकडे बोलवाबोलवी करण्यांतच वेळ निघून गेला. इतक्यांत वारंटही येऊन पोहोंचलें व ते पकडले गेले !

[ ९ ]

दैनिक वि‌श्वाच्या आजच्या अंकांत एका प्रसिद्ध पुरुषाच्या मृत्यूची बातमी प्रसिद्ध झाली होती. आणि दामूआण्णांस आज चतुर्भुज होण्याचें कारण होतें. कारण तो मेलेला नसून जिवंत होता. सदर गृहस्थ त्यांचा आत्महत्येचा प्रयत्न फसल्यानंतर आज कित्येक दिवसांपासून आजारी आहेत हें दैनिक विश्वांत आज कित्येक दिवसांपासून प्रसिद्ध होत होतें. इतकेंच नव्हे तर त्यांच्या आत्महत्येचें अंतस्थ कारण, पुढें हैपत घेऊन पडून आतां आजारांतही विष मिळण्याचा त्यांना प्रयत्न वगैरे सर्व हकीकतही दैनिक विश्वानें बाहेर पाडलेली होती. सदर गृहस्थास आत्महत्या करून घेऊन आपल्या पेढीचें दिवाळें काढावयाचें होतें. पण हा सर्व बेत

दैनिक विश्वाच्यामुळें फसला, लोक सावध झाले व सरकारनेंही जाप्ते बसावीले त्यामुळें सदर गृहस्थ दामूआण्णाविषयीं जळफळत होते.

दैनिक विश्वाच्या बहादूरीच्या अभावीं हजारों लोकांच्या ठेवी बुडून ते सर्वस्वी नागावले असते. यामुळें ठिकठिकाणचे सर्व लोक दामूआण्णांस व त्यांच्या दैनिक विश्वास धन्यवाद देत होते. दैनिक विश्वाच्या लोकप्रियतेचें क्षेत्र असलें विस्तृत असल्यामुळें असल्या एकटया दुकस्याच्या वैमनस्यानें काय होणार? पण या जगांत मोठो मौज दृष्टीस पडते ती ही कीं, मोठ्या गोष्टीच्या नाशाचें मर्मस्थान अत्यंत नाजूक असतें. पेशवाईसारखी भरभक्कम पायावर स्थापित झालेली सत्तेची इमारत, पण तिचा धुवा उडविण्यास नानाफडणीस, बापूगोखले, असल्या धेंडाच्या विरुद्ध एकटी आनंदीबाई अबला पुरेशी झाली! आगीच्या हजारों ठिणग्या चोहींकडून उडत असतात व मनुष्य तेवढयांतही धाडस करून आंत उडी घालतो व विवक्षित गोष्ट करून पार निघून जातो. पण त्या हजारों विझून जाणाऱ्या ठिणग्यांतूनही एखादे वेळीं एकादी ठिणगी अशी कांहीं सतेज निघते कीं ती जेथें पडते तेथें एकदम पेटच घेऊन उठते. व पेटते तर पेटते, पण अशी पेटते कीं तिला विझविण्याकरितां केलेल्या सर्व प्रयत्नांना दाद न देतां ती त्याची पुरेपूर राखरांगोळी करून टाकते तेव्हांच स्वतः शांत होते. दैनिक विश्वाच्या वैभवगिरीस उलथून पाडण्यास आज केवळ सदर गृहस्थांचें वैमनस्य हेंच बलवत्तर कारण झालें! चूक कशी व काय झाली तें आतां पुढें कळेलच!

## [ १० ]

झटपट चौकशीसाठीं दामूआण्णांना न्यायाधीशापुढें उभें करण्यांत आलें. त्यांना जामीन होण्यास व त्यांच्या तर्फे वकिली करण्यास अनेक मंडळी कोर्टांत उभीं असणार हें सांगावयास नकोच. खटला पाहण्यासही हजारों लोक लोटले होते. शेवटीं रस्ते बंद करून घेण्यापर्यंतही पाळी आली.

फिर्यादीनें आपल्या अब्रूनुकसानीबद्दलची आपली फिर्याद आहे असें सांगितलें. आपल्या संबंधाची माहिती देतांना प्रसिद्ध झालेले सर्व अंक पुराव्यांत दाखल करून आपली अब्रू खराब करण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न आरोपीकडून अनेक दिवसांपासून अशारीतीनें चालला आहे असें त्यानें सांगितलें व आजच्या अंकाची विक्री करणाऱ्या मुलांच्या साक्षीही प्रसिद्धीच्या सिद्धीसाठीं दिल्या. दामूआण्णावर आरोप ठेवण्यांत आला. आरोपी या नात्यानें त्यांनीं आपल्या कैफियतींत सांगितलें कीं, " बातमीदारांकडून बातमी इकडे येतांना मार्गांत कांहीं गफलत

झाली असावी किंवा ती कंपोझ करवून छापतांना छापखान्यांत कांहीं घोंटाळा झालेला असावा. खोटी बातमी प्रसिद्ध करण्याचें मला कांहीं कारण नाहीं व आज पर्यंत मीं कधींही केलेली नाहीं. फिर्यादीनें जे पूर्वीचे अंक रुजू केले आहेत त्यांतील बातम्या खोट्या असल्यास सिद्ध करून दाखवावें. माझ्या प्रामाणिकपणाबद्दल व सद्धेतूबद्दल माझ्या दैनिक विश्वाचे आजपर्यंतचे सर्व अंक हेंच सर्टिफिकेट असल्यानें यासंबंधानें यापेक्षां मी कांहीं एक जास्त सांगूं शकत नाहीं." कोर्टानें नंतर "तुह्माला कांहीं आणखी पुरावा देण्याची इच्छा आहे काय ?" असें दामूआण्णांस विचारलें तेव्हां त्यांनीं 'नाहीं' असें उत्तर दिलें. ज्याच्या मरणाची बातमी प्रसिद्ध झाली तोच कोर्टापुढें जिवंत हजर झाल्यावर आतां आणखी कसला पुरावा पाहिजे ?

यावेळीं बातमीखात्याच्या संपादकांकडून त्यांना पुष्कळ उपयुक्त माहिती मिळवितां आली असती; पण तो नव्हता त्यामुळें दामूआण्णांचा निरुपाय झाला. तो भीतीनें पळून गेला होता किंवा यासंबंधाच्याच कांहीं विशेष तपासासाठीं गेला होता तें कोणासच ठाऊक नव्हतें; तथापि फिर्यादी पक्षास आरोपीविरुद्ध बोट दाखविण्यास तेवढें एक चांगलेंच कारण झालें.

परंतु न्यायाधिशांनीं या मुद्याला विशेष महत्व मुळींच दिलें नाहीं. त्यांनीं दामूआण्णांचा आजपर्यंतचा लौकिक व दैनिक विश्वपत्राचा शुद्ध हेतु हींच जमेस धरून दामूआण्णा निर्दोषी आहेत असा आपला अभिप्राय देऊन उपरी कोर्टामार्फत सरकारांत तो मंजुरीसाठीं पाठविला. तेथें तोच निकाल कायम होऊन आला व दामूआण्णांस सोडून देण्यांत आलें.

[ ११ ]

इकडे हा प्रकार चालला असतांना दामूआण्णांच्या प्रतिस्पर्ध्यानीं जणूं काय चळ भरल्यासारखें वेडे वेडे चार चालविले होते. "दैनिक विश्वांत मृत्यूची प्रसिद्ध झालेली बातमी अगदीं खोटी आहे. सदर गृहस्थ विद्यमान असून त्यांनीं स्वतःच कोर्टांत फिर्याद दाखल केली आहे" असें कित्येक पत्रांनीं प्रसिद्ध केलें, तर कित्येकांनीं दामूआण्णास पकडल्याची बातमी देऊन 'यांना नेहमींच कांहीं तरी खोट्या बातम्या प्रसिद्ध करण्याची टेव असे. आजपर्यंत अशा किती भुलथापा प्रसिद्ध झाल्या असतील व त्यामुळें किती लोक फसले असतील कोण जाणें; पण आज पापाचे घडे भरले' वगैरे यथेच्छ तोंड सुख घेण्यासही कमी केलें नाहीं. इतर बऱ्याच विरुद्ध पत्रकारांना आपल्या धंद्यांतला हा एक

मोठा कांटा अनायासें नाहींसा होत आहे हें पाहून आनंद वाटत होता; परंतु कोर्टाचा निकाल ऐकतांक्षणींच सर्वांचीं तोंडें पुन्हां बंद झालीं.

दामूआण्णा सुटले, त्यांचा छापखाना खुला झाला व दैनिक विश्वही पुन्हां सुरु करण्यास परवानगी मिळाली. परंतु दैनिक विश्वाच्या सर्व सरकारी, निमसरकारी व खासगी पुरस्कर्त्यांना हें कसें काय झालें असेल याची अटकळ होईना. अनेक बाजूंनीं अनेक गोष्टी कानावर येत. आजपर्यंत या मंडळींनीं कधीं दामूआण्णांच्या अंतर्व्यवस्थेंत मन घातलें नव्हतें व तें घालण्याचें कारणही त्यांना नव्हतें. परंतु झालेली चूक पुन्हा होऊं नये ह्मणून दामूआण्णांच्या चांगल्यासाठीं ते त्यांस सविस्तर अंतर्व्यवस्था पुसूं लागले.

दामूआण्णा ह्मणाले, "माझ्या बातमीखात्याचे मुख्य संपादक कोठें गेले आहेत तें कळत नाहीं. नाहींतर सर्व खुलासा झाला असता. अंतर्व्यवस्था इतकीच कीं त्यांना जरी आम्ही संपादक ह्मणतों तरी या पत्राला बातम्या पुरविणारे भागीदार या नात्यानें त्यांचा आमचा संबंध. बातम्या व बातमीदार यां संबंधाची सर्व व्यवस्था त्यांची. आह्माला कांहींएक ठाऊक नाहीं. आमच्या येथें त्यांचें "युनिव्हर्सल न्यूज एजन्सी"–( जगाच्या बातम्या देणारी कंपनी ) या नांवानें खातें आहे. दैनिक विश्व अस्तित्वांत येण्याच्या पूर्वी सात आठ दिवस त्यांचा आमचा संबंध झाला."

या नंतर दामूआण्णांनीं त्या गृहस्थाच्या व आपल्या भेटीसंबंधाची पहिली सर्व सविस्तर हकीगत सांगितली. परंतु असल्या विस्तृत पायावर त्यांची एजन्सी होती तर बातमीदारांचा पत्ता लागत नाहीं असें जें प्रतिपक्षी ओरडत होते त्यांतलें इंगित काय तें कांहीं कळेचना. तेव्हां कांहीं मंडळींनीं त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांत या संबंधानें तपास चालविला. दामूआण्णांस शिक्षा झाली असती तर कदाचित प्रतिस्पर्ध्यांच्या फुशारक्यांतून, कांहीं गूढ माहिती असल्यास तिचा पत्ता लागणें शक्य झालें असतें. पण आतां सर्वांचीं तोंडें बंद झालेलीं. तरीपण कांहीं हितचिंतक अधिकाऱ्यांनीं आपल्या सत्तेच्या भपक्यांत प्रतिस्पर्ध्यांना बोलावून आणून युक्तीनें माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. व तो शेवटीं सफळही झाला. हें कसें काय झालें याचा सर्व पत्ता लागला.

## [ १२ ]

फिर्यादी गृहस्थांना ( ज्यांच्या मृत्यूची बातमी दैनिक विश्वांत प्रसिद्ध झाली होती त्यांना ) अधिकाऱ्यांनीं खासगी रीतीनें बोलावून विचारपूस केली. 'तुम्ही

एवढी फिर्याद ती कशाला केलीत ? खासगी रीतीनें चूक दुरस्त करवितां आली नसती का ?" वगैरे समजुतीच्या गोष्टीपासून त्यांनीं बोलण्यास सुरवात केली. तो गृहस्थ ह्मणाला, माझा दामूआण्णावर रोष होता तरी फिर्याद करण्याचा माझा मुळींच विचार नव्हता. परंतु कांहीं गृहस्थांनीं मला भरीला घातलें. अधिकाऱ्यांनीं त्या गृहस्थांचीं नांवें विचारून घेऊन त्यांना बोलावलें व ह्मणाले, "ही अशी फिर्याद करण्याची भलती सल्ला तुह्मीं आपल्या स्नेहास देणें योग्य आहे का ?" दामूआण्णांचा पसारा केवढा, किती लोकांना या धंद्यानें पोटें भरतां येत आहेत व त्यामुळें सरकारला व लोकांना किती फायदा होतो आहे याचा तुह्मी कांहींतरी विचार करावयाचा होता. इतक्या असंख्य बातमीदारांचें जाळें पसरून चालविलेलें दैनिक पत्र आज दुसरें कोठें आहे का ?"

पहिल्या एक दोन प्रश्नापर्यंत या इसमांनीं ओंठही हालविला नव्हता; व असेच प्रश्न आणखी पुढें चालते तर त्यांनीं निमूटपणें सर्व ऐकून पण घेतले असते आणि मग त्यांत कांहीं तथ्यही निघालें नसतें; परंतु दामूआण्णांची प्रशंसा जेव्हां निघाली तेव्हां मात्र त्यांना धीर धरवला नाहीं. कोर्टांत आपला डाव फसला परंतु इथें तरी साधल्यास पहावें या हेतूनें ते एकदम उसळून ह्मणाले कीं, "बातमी आणि बातमीदार हें सर्व झूट आहे. दैनिक विश्वाचे कोणीही बातमीदार नव्हतें. दामूआण्णांनीं मानसशास्त्राच्या जोरावर हें सर्व ढोंग माजविलें होतें व आहे. आमच्या डोक्यांत प्रथम ही कल्पना आली व प्रयोगांत तीच खरी ठरली. हे एकाग्र मन करून बसले ह्मणजे चोहींकडचे जोराचे विचार यांना संवेद्य होत व मग तें बातमीच्या रूपानें ते सर्व छापून प्रसिद्ध करीत. आमच्या उलट प्रयोगाची गुप्त बातमीही त्यांना यामुळेंच कळत असे. आह्मी सारखे टपून होतों. तें शेवटीं आज साधलें. ते गृहस्थ मेले हा जोराचा विचार आह्मींच सोडला. व लागलाच छापून निघालेला पाहून त्या गृहस्थास फिर्याद करण्याची भर दिली. दामूआण्णांचें वजन मोठें, आपली सर्वांची त्यांच्यावर व त्यांच्या पत्रावर मेहेरबानी ह्मणून ते न्यायांत सुटले हें सर्व ठीकच आहे. पण महाराज, आंतली खरी व गूढ हकीगत अशी आहे."

"पण मग त्यांच्या बातमी खात्याचा संपादक 'घात झाला' असें ह्मणत रस्त्यांतून धांवत होता तें कां ?" असें कांहींनीं विचारलें तेव्हां ते ह्मणाले, "बरोबर! मागाहून आमच्या हालचालीची बातमी त्यांना कळली असेल व त्यामुळें घोंटाळा झालेला पाहून तो घाबरला असेल. आपण 'युनिव्हर्सल न्यूज

एजन्सी' याची होती असें ह्मणतां तेव्हां कदाचित् दामूआण्णांच्या ऐवजीं हा संपादकच मानसशास्त्रज्ञ असेल."

[ १३ ]

झालें. बहुतेक सर्व उलगडा झाला. अधिकारी मंडळींनीं लागलेंच दामूआण्णांस बोलावणें पाठविलें तों तेही आपणांस आलेलें एक महत्वाचें पत्र दाखविण्याकरितां तेथें येऊन पोहोंचले. अधिकाऱ्यांनीं ती सर्व हकीकत दामूआण्णांस सांगितली. दामूआण्णांनींही ती खरी आहे असें म्हणून आपल्याजवळचें पत्र त्यांच्यापुढें टाकलें. तें पत्र त्यांच्या बातमीखात्याच्या संपादकाकडूनच त्यांच्या चिरंजीवास आलें होतें. त्यांत पुढील मजकूर होता–

"आपल्या दैनिक विश्वाच्या कार्यांत आपल्या कोणीं प्रतिस्पर्ध्यानें आपला जाराचा खोटा विचार आपल्याकडे पाठवून दगा केला तो कांहीं वेळानें माझ्या ध्यानांत आला पण तेव्हां पत्र बाहेर पडलें होतें. मीं धांवाधांव केली त्याप्रमाणें जर अंक वाटले व विकले गेले नसते तर पुन्हां दुसरी पुरवणी देऊन आपल्याशीं दगा करणारांची चांगला समाचार घेतला असता; परंतु अंक विकले गेल्यानें निरुपाय झाला. बाळासाहेब ( दामूआण्णांचे चिरंजीव ) जोराचा विचार आणि तो पाठविला असें मी ह्मणतों तें काय हें आपल्या ध्यानांत येणें शक्य नाहीं ह्मणून आज स्पष्ट उघडें करतों. माझी युनिव्हर्सल एजन्सी हें एक धंद्यापुरतें बाह्यात्कारी नांव होतें. बाकी मी सर्व ज्ञान–माहिती मानसशास्त्राच्या साह्यानें मिळवीत असें. व तेच माझे बातमीदार. दुसरे पगारी व भाडोत्री बातमीदार मीं मुळींच ठेवले नव्हते. परंतु अशा शास्त्रीय पायावर उभारलेल्या उद्योगांतही असल्या विरुद्ध कौटिल्यानें असें अपयश आलें. परंतु अपयश हें देखील पुढच्या यशाचा गुरु होत असतें. मी पळालों तो भीतिमुळें नव्हे तर माझ्या शास्त्रीय प्रयत्नांत उगीच खळ पडेल ह्मणून. हल्लीं मी येथें हरिद्वारीं जंगलांत माझ्या मानसशास्त्राचा अभ्यास जारीनें चालविला असून त्यांत लवकरच यश येऊन पूर्ण सामर्थ्यवान् होईन असें मला वाटत आहे. दामूआण्णा बहुतेक सुटतील परंतु सुटले नसल्यास व आपण पत्र चालवीत असल्यास तें आपण होऊनच बंद ठेवावें. मी आल्यावर मग यशस्वी पायावर तें पुन्हां सुरू करूं व आपल्या स्वार्थाबरोबर आपल्या सरकारास व देशबांधवांस मदत करण्याचा परमार्थ साधूं. दामूआण्णा सुटून आल्यावर त्यांसही असेंच सांगावें. मात्र माझें येथलें वास्तव्य अगदीं गुप्त ठेवावें ह्मणजे माझ्या अभ्यासांत मला व्यत्यय येणार नाहीं...."

झालें. आतां काय बाकी राहिलें? दैनिक विश्वाच्या या दुय्यम संपादकाच्या चातूर्याबद्दल सर्व प्रशंसा करूं लागले. 'असल्या मनुष्याला सरकारांतून त्याच्या विद्याभ्यासाच्या कामीं उत्तेजन मिळावें अशी अधिकाऱ्यांनीं वर शिफारस केली. ती वरिष्ट सरकारासही पसंत पडली. सदर मानसशास्त्रज्ञांस परत बोलावण्यांत आलें. परंतु त्या मानसशास्त्रज्ञानें शेवटीं प्राप्त होणारी जी समाधि ती तेथें एका महात्म्याच्या प्रसादानें आपल्याला लाभली असें कळवून आतां त्या सुखापुढें ऐहिक उपाधी सहजच नकोशा वाटतात असें कळविलें आणि त्यामुळेंच ते योगी पुन्हां परत आले नाहींत व दैनिकविश्वाच्या उलाढालींत पडले नाहींत. लोकांत त्यांची प्रसिद्धि झाल्यामुळें अनेक लोक हरिद्वारीं त्यांच्या भेटीस जाऊं लागले; पण तीही उपाधि सहन न होऊन एका रात्रीं ते कोठें गुप्त झाले त्याचा आजपर्यंत पत्ता नाहीं!

—एकयोगी.

---

## आनंदाचें गणीत.

ब्रह्मज्ञानें ज्या पुरुषाला मुक्ति मिळे रोकडी।
तया ही विद्यासुख चौकडी ॥ ध्रु० ॥

ही विद्यासुख चौकडी कोणती? तर,

दुःखनिवृत्ती, इच्छातृप्ति तैशी कृतकृत्यता।
सर्वहि प्राप्यचि येतें हातां ॥
तीं ही देहावरचें मीपण गेलें जैं तत्वतां।
ऐहिक दुःख जाय सर्वथा ॥
विद्यायौवनरूपयुक्त जो सार्वभौम भूपती।
मानुषानंद पावतो अती ॥
त्याहुनि शतगुण मनुष्यगंधर्वानंदाची गती।
देव गंधर्वा त्याची शती ॥
चाल॥ चिरवासी त्याहुनि पितर शतगुणें सुखी।
शत गुणचि वाढे कर्मदेवशतमखीं।
याहुनी अधिक तें बृहस्पतिश्रुतिमुखी ॥ चाल ॥
विद्यानंदाची तुह्मि जाणा या सर्वांवर कडी ॥
तया ही विद्यासुख चौकडी ॥ १ ॥

—पंचदशी

# वसंत.

## पद.

मौज खरी, अजि मौज खरी।
नाचूं खेळूं परोपरी ॥ ध्रु० ॥
वसंत आला ।
खुलवुनि गालां ॥
दिवस रंगला ।
गात मंगला ॥
फुलें विकसलीं ।
खदखद हंसलीं ॥
मारुत सुटला ।
सुगंध उठला ॥
फूलपांखरें ।
पसरलीं त्वरें ॥
मौज खरी, अजि मौज खरी।
नाचूं खेळूं परोपरी ॥ १ ॥
निशा स्वकालीं ।
सितपट ल्याली ॥
गगनीं सारे ।
फुलले तारे ॥
सृष्टिदेवता ।
घे प्रसन्नता ॥
प्रहर्ष वाटे ।
प्रशांति दाटे ॥
खालीं वरतीं ।
प्रीतिस भरती ॥
मौज खरी, अजि मौज खरी।
नाचूं खेळूं परोपरीं ॥ २ ॥

कोल्हापूर. —सुमंत.

## गुलाबाचा आत्मवृत्तांत.

ऐशी मैल लांबीची विस्तीर्ण बाग!–अशक्य वाटेल तर कल्पना करा. तेथें माझा जन्म झाला. माझ्या काळजांतला एक थेंब, पण त्यासाठीं तुम्हीं ओंजळभर पैसे कुरबान कराल. मग मी माझें सत्व शेरभर काढून दिलें तर तुह्मीं आठआठ दहादहा पौंड द्याल यांत नवल काय? माझ्या नांवावर कांहीं हलकट तुह्माला भपका दाखवून व अल्प मोलाची–सुमारें आठदहा आणे शेर अशी–गोडी लावून तुमच्यापासून पैसे उपटीत असतील; पण महाराज, मी तो मीच. अस्सलाची सर नकलेला कशी येणार? माझी खुमारी मलाच!

तुह्मी ह्मणाल कीं, सत्व तें सत्व; त्याची खुमारी किती टिकणार? ताज्या फुलांत जी बहार असणार ती नेहमीं सत्वांत थोडीच तशी ताजी राहणार? पण वाचकहो! नुसत्या कविकल्पनांवर व उपमांवर कां भागवितां? हातच्या काकणाला आरसा कशाला पाहिजे? चला, परीक्षा पहा- माझें सत्व वर्षानुवर्ष एका बाटलींत भरून ठेवा व तुमच्या मनास येईल तेव्हां उघडून पहा. तें जर तसेंच्या तसेंच तुह्माला आढळलें तरच तें जातवंत अगर अस्सल ह्मणा, मग काय? तुह्मी फुलांचा कैवार घेतां, पण तीं कोमेजतात, सडतात. व सुकतात. पण सत्व तसेंच राहतें हें ध्यानांत ठेवा.

तुह्मी मराठी वाचक, संस्कृताचे संस्कारी, ह्मणून सत्व हा शब्द बाकी माझ्या सत्वाला अत्तर हा पर्शियन शब्दच रूढ आहे. कारण माझ्या सत्वाची ओळख प्रथम पर्शियन लोकांस झाली. आणि माझें सत्व पिळून काढण्याचे कारखानेही प्रथम पर्शिया देशांतच निघाले. तेथून मग या कलेचा प्रसार सर्व जगभर झाला व माझें नांव जगजाहीर झालें.

माझी जन्मभूमि–तें विस्तीर्ण उद्यान–बाल्गेरिया देशाचा एक भाग म्हणजे रुमेलिया मधील थ्रेसचें मैदान ही होय. तुर्कलोक हे आमचे आद्यजनक. यांनीं कॉन्स्टन्टिनोपल येथें पातशाच्या झनान्यास अत्तर पुरविण्याकरितां आमची तेथें–थ्रेसच्या मळ्यांत–अगदीं प्रथम लागवड केली. जगाच्या निरनिराळ्या भागांत दुसऱ्या अनेक बागा आहेत, पण या थ्रेसच्या बागांची कोणासही बरोबरी करतां येणार नाहीं. युरोपमधील त्या भागांतल्या जमिनींत गव्हाच्या शेतांतही आमची लागवड होऊं शकते. कारण त्या जमिनींत आह्मांला अनुकूल असाच गुण आहे! तेथ जन्मलेले व वाढलेले तेच आमच्यांत अस्सल. या अस्सलांच्या वासाची बरोबरी दुसऱ्याच्यानें होत नाहीं. एरव्हीं तुह्मी आमची जन्मभूमि पहाल तर नजर पोहोंचत नाहीं इतक्या लांबवर एकसारख्या चोहींकडे कांटेरी झुडपांच्या रंगांच्या रांगाच पसरलेल्या दिसतील. पण एकदां आह्मी

आमच्या पणांत आलों व फुलूं लागलों ह्मणजे आमची शोभा व ऐश्वर्य हीं पाहून घ्यावीं. नेत्रांचें पारणेंच फिटून जातें.

मे महिना संपतां संपतां आमचा पहिला बहर येतो. आमचे आईबाप–माळी आणि माळिणी उल्लसित होऊन आमच्या त्या क्रीडांगणांत ऊर्फ बागेंत धांवत येतात. आह्मांलाही आनंदाचें भरतें येतें. आमचे कांटे त्यांना बोंचतात, त्यांचे कपडे फाटतात, केश विखुरतात; पण मायेच्या भरांत त्यांना आमच्या बालचेष्टा जाणवत नाहींत. आमच्या आईबापांच्या पदरांत जाण्यासाठीं आह्मी मनांतून अगदीं हपापलेलें असतों; पण आमच्या पोरस्वभावाप्रमाणें त्यांच्या हातून वारंवार निसटून त्यांना आम्ही फार पजवितो! एका एकरांत त्यांना आमची सुमारें एक लक्ष फुलांची पैदास होते.

मुलांचे लाड खाण्यापिण्याच्या बाबतींत आईबाप पुरवितात. एरव्हीं त्यांना जगाच्या उपयुक्त करण्याकरितां जसे चरकीवर धरल्यासारखें करतात त्याच प्रमाणें आमच्या झाडांचे लाड आमचे आईबाप यथेच्छ व काळजीनें पुरवितात, परंतु एकदांका आह्मी फुललों कीं मग ते आमची क्षमा करीत नाहींत. आह्माला डाक्याखांद्यावर घेऊन घरीं आणण्याचा अवकाश कीं, लागलीच आह्मां सर्वांना ओहोळावर तापत असलेल्या ताम्रपात्रांतील आधणांत टाकतात. त्या भांड्याच्या तोंडाला एक नळी लावलेली असते व ती थंड पाण्याच्या हौदांतून एका बाटलींत सोडली असते. आमची वाफ होते ती या नळींत शिरते व हौदांतील थंड पाण्याशीं लगट करून जातांनां तिचें द्रवीभवन होऊन ती आमच्या पातळ सत्वाच्या रूपानें तिला जोडलल्या बाटलींत अगर बरणींत पडते. हेंच गुलाबपाणी होय.

अशा रीतीनें या गुलाबपाण्याच्या रूपानें आह्मीं पुनर्जन्मांत आल्यावर पुन्हां आमची अधिक छान होण्याचे संस्कार (distilling process) आमच्यावर होतात. यांत आह्मांस जी अवस्था प्राप्त होते त्या अवस्थेंत आम्हांला उघड्या तोंडाच्या पात्रांत रात्रीच्या हवेंत उघडें ठेवण्यांत येतें. जणूंकाय आह्मांला तो कांहीं वेळ विसावाच असतो. पण आह्मीं बाहेरची हवा जरा खातों न खातों तोंच पुन्हां फुरफुरून जातों. आमच्या त्या पातळ पदार्थावर एक पिंवळ्या रंगाचा तेलकट थर जमतो. वाचकहो! तेंच आमचें अत्तर. लागलीच तें झाऱ्यावर काढून घेतात आणि जींत यत्किंचित्‌ही हवा शिरणार नाहीं अशा (Air-tight) तांब्याच्या बरणींत भरून ठेवतात. पोपटा-प्रमाणेंच आम्हांला इतक्या पक्क्या बंदोबस्तांत ठेवण्यांचें कारण हेंच कीं, नाहींतर आह्मी उडून जाऊं! आमचें अत्तर इतकें महाग कां असतें हें आता

पाहून घ्या. एक एकरांमध्यें होणाऱ्या एक लाख फुलांत आमचें अत्तर फक्त फार फार तर एक पौंड निघतें !

आमचें हें अशा रीतीनें काढलेलें अत्तर शुद्ध व अस्सल असतें हें मीं पूर्वीं सांगितलें खरें, पण त्यांतली एक गोमही मला आतांच सांगून टाकूं द्या; ती ही कीं, शुद्ध अत्तर पांढऱ्या गुलाबांच्या मदतीवांचून तयार होत नाहीं. आमच्या कातींत त्या पांढऱ्या गुलाबांचाही भाग असतो. आमच्या बरोबर पांढऱ्या फुलांनाही उकळून घ्यावें लागतें. गुलाबी गुलाब सुगंधांत श्रेष्ठ पण त्याचा तो सुगंध एकवटून ठेवणारा त्यांत बऱ्याच प्रमाणांत असणारा जा तेलकट पदार्थ तो पांढऱ्या गुलाबाचा असतो.

हें आमचें सत्व मग आमचे माळीबाबा एखाद्या अत्तराच्या कारखानदाराला अगर व्यापाऱ्याला विकतात. व तो मग चोहींकडे त्याची विक्री करतो. त्याला स्वतःला गुलाबाची बागाईत करण्यापेक्षां असें तयार अत्तरच माळीबाबांकडून घेणें परवडतें. असल्या शुद्ध एक औंस सत्वाबद्दल माळीबाबास अठरा शिलिंग मिळतात.

बहुतेक सर्व अत्तरें प्रथम अशीं शुद्ध रीतीनेंच काढलेलीं असतात, परंतु तीं घेणारे कित्येक व्यापारी आपल्याला ज्यास्त नफा मिळावा म्हणून मग त्यांत मागाहून चंदनी तेलासारखे दुसरे सुगंधि पदार्थ मिसळतात. त्यामुळेंच शुद्ध व अस्सल अत्तर दुर्मिळ असतें. असलीं बनावट अत्तरें विशेषतः कॉन्स्टान्टिनोपलमध्येंच फार होतात. कांहीं ठिकाणीं नुसत्या खऱ्या अत्तरानें बाटल्या भरून त्या रिकाम्या करितात व लागलीच त्यांत--त्या अत्तरानें माखून सुगंधित झालेल्या बाटल्यांत–कसलेंतरी साधें तेल भरतात व तेंच खरें अत्तर ह्मणून विकतात. केव्हां केव्हां चांगले हुषार लोकही नुसत्या वासाच्या भपक्यामुळें तीं विकत घेऊन चकतात.

खऱ्या अत्तराची परिक्षा हीच कीं, सुगंधी द्रव्य या नात्यानें केवळ त्याचा प्रत्यक्ष उपयोग करतांच येत नाहीं. त्याचा वास मोठा त्रासदायक असतो. वाचकांना आश्चर्य वाटेल; पण जेथें अत्तरें काढतात त्याच्या आजूबाजूची हवाही मनुष्याला आजारी पाडण्यासारखी असते. त्या उग्रवासानें त्याचें डोकेंच चढून जाईल. त्याचा वास इतका उग्र असतो कीं तें एखाद्या दुसऱ्या जैतूनच्या सारख्या तेलाबरोबर मिश्रित केलें ह्मणजेच सौम्य होतें. आणखी खऱ्या अत्तराची दुसरी परीक्षा अशी कीं, तें वरप्रमाणें मिश्र करण्याच्या वेळीं इतका सुंदर सुगंध सुटतो कीं तेथें ताजी गुलाबांची बागच फुलली आहे कीं काय असा भास होतो. हेंच खरें अत्तर. एरव्हींचीं अत्तरें नांवापुरतींच !

**गुलाबराव.**

# बुद्ध – बोध.

—:०:—

## खंड पहिला.

अरण्यमय तो प्रदेश सारा संध्यासमय जहाला
निशासुंदरी लाजत आली लेउनि कृष्णपटाला १
विविध वर्णयुत विहंगमांचा कलरव होई शांत
स्तब्ध बैसले बुलबुल पक्षी सेवित जणुं एकांत २
मधुनि मधुनि परि कांहीं पक्षी काढुनि मधुर रवाला
बाहत होते गेहीं यायां प्रेमें स्वसहचराला ३
जंबुतरुतळीं घालुनि आसन जानूवर कर ठेवी
धरुनि स्थिर शिर बुद्धप्रभु तो निर्वाणरसा सेवी ४
खालीं वरतीं मागें पुढतीं चोहिकडेही शांति
संचरला कीं प्रसाद दैवी किंवा दैवी कांती ५
ऐशा समयीं नास्तिक अथवा श्रद्धाराहित जनानें
बुद्धापुढतीं केलें असतें नत शिर भक्तिभरानें ६
क्रौर्य अंगिचें विसरुनि जाउनि वन्यपशूही सारे
बुद्धप्रभुच्या निकट बैसती होउनि दीन बिचारे ७
निजलें होतें सुंदर बाळक अंकावरि हरिणाचें
सन्निध हरिणी बसली होती विसरुनि नांव भयाचें ८
हरिण-शिशू परि सहसा नासा फुगवी शिर वर करुनी
भूमितलगत द्रुतपदनादा गभीर ऐशा श्रवुनी ९
वृक्ष गणांतुनि पादातिताति क्षणांत ये बाहेर
या पंक्तीचा नायक होता एक तरुण सरदार १०
हिरेजडित भरजरी अमोलिक सुंदर वसनें त्याला
सुंदर वसनीं रूपही सुंदर मोहवि जें सकलांला ११
वीर तरुण तो निज अनुयायां दूरी उभे रहायां
खूण करोनी एकलाच ये बुद्धदर्शना घ्यायां १२
भव्य अशा त्या शांत मूर्तिच्या येउनि अगदीं निकट
साष्टांग प्रणिपात करुनियां करि निज भक्ति प्रकट १३

पुनः उठुनियां हात जोडुनी राहे उभा तसाच
घनश्याम रघुरामपदांबुजिं अंजनिनंदन साच १४
शांत स्थिर परि बुद्धप्रभु तो चलन वलन हि न केलें
आंतुनि त्याचें त्या तरुणास्तव कोमल हृदय द्रवलें १५
असो शेवटीं तो मदनाचा पुतळा बोलूं लागे
"भगवन् मी प्रणिपात करितसें अपुल्या चरणीं लागें १६
कंचंबाहुनि आलों येथें दूर असे मम देश
राजतनय मी, नाम जेत मम, यांत अनृत नच लेष १७
कृपाप्रसादास्तव घेतियलो धांव दुरूनी येथें
भ्रमराच्या पडतात उड्या रस असतो जेथें जेथें १८
प्रभो आपुली कीर्ति ऐकिली तेव्हांपासुनि कांहीं
सौख्यद नाहीं अशन, शयनही, तनुमन अपुणा वाहीं १९
धनदापरि मज लक्ष्मी असतां रंभेपरिही दारा
सुखद न वाटे या हृदयाला, ध्यास लागला सारा २०
कृपा करुनियां शिष्य करा मज मीही अपुला आहे
तारा मारा कांहिं कराहो अपुल्या चरणीं राहें" २१
बुद्धप्रभु तो अंतर्ज्ञानी कृपा दृष्टिला वळवी
राजकुमारावरी परंतु हितगुज मुखिं ना कळवी २२
पुन्हां वदे तो प्रेमळभावें बद्धांजलि सरदार
"भगवद्भाषण परिसायाला नाहीं कां मिळणार २३
कृपाप्रसादा पात्र नाहिं कां सेवक हा हतभागी
भ्रमवुं नका मज उगीच वणवण महिवर जागोंजागीं २४
सेवित आलों शुद्धाचारा बाळपणापासून
सकल जाणतां आपण तरिमग किती कथुं मी होऊन २५
धर्मनीतिची कधिं न भंगिली आज्ञा दासानें ती
बाळगिली मीं गुरुवर्यांची नित्य मनामधिं भीती २६
शिष्य व्हावया पात्र नाहिं कां भगवन् ऐसें असुनी
घेतां कांहो अशी परीक्षा इतुकी कसुनी कसुनी" २७
शांतपणानें उत्तर दिधलें बुद्धप्रभुनें "नाहीं"
गुरुकिल्ली ती यांत दाविली सर्व गूढ जी कांहीं २८

"हे भगवन् निज शिष्य व्हायां पात्र कधीं होईन
सांगा सांगा दास जाहला चरणीं सादर दीन २९
द्या ह्या विनतिस उत्तर माझ्या वंद्य तेंच मानून
तदनुसार मी वर्तन ठेविन काय मला हो न्यून" ३०
"तुझें तूंच बा शोधुनि पाहीं, तुझें तुलाच कळेल
प्रीतिदेवता करुणरसाविण कशी कुणास वळेल ३१
विनत जाहल्याविना न कांहीं लब्ध होतसे लोकीं
तरुछायेला उभे राहुनी कैचें फळ अवलोकीं ३२
सागरतीराजवळ जाउनी सागरांत जी कांहीं
असतीं रत्नें बुडी मारिल्याविणें न मिळतीं पाहीं" ३३
खिन्नस्वर काढुनी विचारी कुमार मग बुद्धास
"शोध कशाचा करूं प्रभो मी, सांगा या दासास" ३४
बुद्ध प्रभुनें कांहीं न उत्तर दिधलें राज-कुमारा
दृष्टि उघडुनी अमृतवृष्टिचा केला केवळ मारा ३५
"जशी प्रभूची आज्ञा" ऐसें बोले राजकुमार,
"शोध करिन मी परि माझी ही होय परीक्षा फार" ३६
"असेल तैसें" असें बोलला श्रीबुद्धप्रभु त्यास
अर्धस्फुट वचपुष्पीं मनुजा संशय येतो खास ३७
"पुनर्दर्शना केव्हां यावें व्हावी आज्ञा दासा
सार्थक व्हावें या देहाचें न मनीं दुसरी आशा" ३८
"शुक्लपक्ष जाऊंदे सात हा वर्षाऋतु संपून"
श्री बुद्धप्रभु वदे तयाला "भेट मला येऊन" ३९
प्रणाम करुनी देवातें कुमार तेथुनि चाले
अनुचर तेही चालुं लागले शांत पुनः वन झालें ४०
हरिणी अपुल्या तनयासह त्या दिव्य नराच्या अंकीं
शिर ठेउनियां निद्रासुख घे किमपिहि न मनीं शंकी ४१
बुद्धप्रभुही निमग्न झाला पहिल्या परिस ध्यानीं
दत्तात्रयसुत चरित तयाचें यथामती हें वानीं ४२

## खंड दुसरा.

दिवस यामिनी झरझर गेल्या अवधी पूर्ण जहाली
त्याच स्थानीं त्याच वनामधिं त्याच जंबुतरुखालीं १

बुद्धदेव तो बसला होता ध्यान लाउनी तैसा
गांभीर्याचा कीं शांतीचा सुंदर पुतळा जैसा २
रविनारायण गेला होता निजसखिच्या सदनाला
अनुरक्ता पश्चिमा तयाला घाली जणु ती माला ३
काळभोर भयंकर नीरद जमूं लागले व्योमीं
जिकडे तिकडे उग्र तशामधि वाराही म्हणतो मी ४
वन्यपशू भयभीत जहाले दिव्य नराच्या चरणीं
येउं लागले आश्रयार्थ ही सारी ईश्वरकरणी ५
तरुशाखामधिं शिरूं लागला पक्षीगणही सारा
आर्तस्वर काढुनी करी जणुं शोक न साहे मारा ६
तुफान झालें सुरू दिशा त्या दहाहि उठती खाया
काय करावें कांहीं सुचेना न कळे ईश्वरमाया ७
खेळत होता लहान चित्ता श्रीबुद्धाच्या चरणीं
नकरी पर्वा आडाहि आले मेघ नभीं तो तरणी ८
बघतां बघतां मुसळधार जल तेणें नम्र तरू ते
कांहिं न होई परिणाम मुळीं त्याचा जंबु-तरूतें ९
श्रीबुद्धाच्या अंगावरती एक न बिंदु जलाचा
विश्व जाणिलें जयें तयाला ताप कसा हो त्याचा १०
पुरता निश्चय जो करि त्याला कल्पभयहि मुळिं नाहीं
निश्चयापुढें काल दीन हो निश्चय ईश्वर पाही ११
निश्चयापुढें वायुहि पंगू निश्चय फार गभीर
त्यापुढती हा सागर अल्पचि सोडी न तया धीर १२
रविहुनि भास्वान् निश्चय सत्यचि चंद्राहुनिही शीत
ब्रह्मानंद-सुखाचे हेतू निश्चय हा पुरवीत १३
असो असा दृढनिश्चयपालक राज-तनय तो जेत
समय पाहुनी ठरलेला ये श्रीबुद्धदेव जेथ १४
प्रणाम करुनी उभा राहिला बुद्धाजवळीं जेत
श्रीशंकर सत्पदारविंदीं भक्त भगीरथ तेथ १५
"वाट बघत मी होतों भगवन् या समयाची भारी
भेट जहाली मजला केऊें आपण बहु आभारी १६

दिवसामागुनि यामिनि यामिनिमागुनि दिवस गणावे
कधिं पाहिन मी दिव्यमूर्तिला अन्य न कांहीं ठावें १७
पुण्यसमय हा इच्छित आला असो शेवटीं धन्य
पवित्र जीवन गाळियलें मीं ध्यान रुचे मज नान्य १८
विषय विषचि, मज धन वमनासम, न गणीं राजपदाला
आधिव्याधी सोसुनि ये पदिं, तारां आतां याला १९
आतां तरि मज शिष्य आपुला ह्मणुनी स्वीकाराया
आली किंवा नाहिं पात्रता अंगीं सांगा राया" २०
शांत दांत जो सिद्ध बुद्ध तो बोले "नाहीं" ऐसें
ऐकुनि नृपसुत जेत विरघळे ढेंकुळ जळांत जैसें २१
धरुनि मुखावरि पदर पटाचा पुत्र अधोमुख झाला
नेत्र अश्रुंनीं भरोनि आले भान नसे लव त्याला २२
स्वर अति कंपित होय तयाचा होई अतिशय दीन
फेंकुनि द्यावा भूमीवरती जसा जळांतिल मीन २३
"इतुकें मजवरि काय कोपला भगवन् बोला बोला
विदित करां कां शिष्य न करितां क्षमा करा या लोला" २४
ध्यानांतुनियां उठला होता बुद्धदेवहि आतां
केवळ कवनीं येइ न त्याचें तेज मला तें गातां २५
हळुं हळुं गुरगुर करितचि होता चित्ता जेत बघून
सुचवी जणुं कीं योग्य न यायां बुद्धाजवळि अजून २६
पाठीवरुनी हात फिरवुनी देव करी त्या शांत
मेघ-गर्जना बंद जहाल्या व्योमीं, जें तें शांत २७
भगवंताची श्रवण कराया वाणी जणुं समीर
स्तब्ध जहाला बोलुं लागला बुद्धहि पंडितवीर २८
"बाह्य जग जया ह्मणति कसोटी ती न कसोटी साची
पार पडाया संतहि थकले काय गती इतरांची २९
नाहिं तुला मीं सांगितलें बा त्यागाया धनदारा
आनंदाच्या वस्तू साऱ्या समज नृपाळ-कुमारा ३०
भोगियले, भोगशी, भोगशिल गतजन्मींचें सारें
तुझें तूंच बा कृतकर्माचें नवल न यांत पहा रे ३१
तुझी कसोटी मी नच पाहीं दैवाचि पाहि तुझें रे
तुजला लावी फिरावयाला इतुके सारे फेरे ३२

विधिनें तुजला जिंकियलें रे यश नच तुजला पाहीं
पार पडाया कसोटींतुनि कार्य न लघु बा कांहीं ३३
पुनः आपुल्या मंदिरिं जाई सदाचारयुत राही
शांतिसुखाचा अनुभव घेई, तत्व यांत बा पाही ३४
शिष्य व्हावया पात्र न दिससी अद्यापिहि तूं माझा
काय सांगु बा, नृपात्मजा तुज, जा आपुल्या नगरा जा" ३५
नृपतितनयमुख पांडुर झालें केवळ भीतिभरानें
"नाहीं" ऐसें ह्मणतां जें हो तें न कथित कवनानें ३६
"प्रसंग ऐसा सांगा मजला आली हार जयांत
किंवा निष्फल मीच निवडलों हे बुद्धदेव शांत ३७
जाणायां तें सिद्ध असें मी यश मजला ज़रि नाहीं
कृपा करुनिया सांगा मजला सुमन आपणां वाहीं" ३८
"एक तुला सांगतों कुमारा गोष्ट दिसे जी साची
प्रथम परीक्षा सहन करावी ती निंदा परक्याची ३९
तुजवरि होता आळ गुन्ह्याचा पितयाच्या दरबारीं
नाहीं धरवला धीर कळें तों लोकस्थिति खरि सारी ४०
मानभंग तव होतचि होता किति भ्यालासि तयाला
दोषमुक्त तूं होउं इच्छिलें युक्तीनें सुटण्याला ४१
शस्त्राहि असतें चालविलें त्वां पूर्ण विचार न केला
ही कां क्षुद्रा होय परीक्षा काल अमूल्याचि गेला" ४२
"नसतां माझा दोष करावा परिणाम सहन त्याचा
कसा प्रभो, मीं? सांगा मजला, मी निर्दोषी साचा ४३
मी निर्दोषी असेंच वदती प्रापंचिक जन जे ते
आत्मोन्नतिपथ नकळे ज्यांतें ते कां इंद्रिय-जेते". ४४
"होइल माझा शिष्य तयानें, आत्मोन्नति पथिकानें
निंदा भीती मुळिं न धरावी सहन करावी मानें ४५
मुगापरी ते दोष गिळावे, अहंभाव सोडावा
निंदास्तुतितें मुळिंहि न गणणें हेंच चढवितें नांवा" ४६
बुद्ध-वदन-मानस-वच-सरसी-रुहरस सेवी भावें
श्रवणमुखानें नृपतिसुत मधुप मधुरपण कसें गावें ४७
"स्वाभिमान तव तुलाच नडला दुजा परीक्षेमाजीं
ह्यासम नाहीं वीर दुजा कुणि ह्याच जगामधिं गाजी ४८

जिवलग होता मित्र तुझा बा एक तुझ्या नगरांत
एक कुणी ये पुरुष पित्याच्या नव तो दरबारांत ४९
स्वार्थासाठीं तव मित्राचा प्रेमा तो संपादी
दुग्धशर्करासंगमिं होई लवण जसें प्रतिवादी ५०
नाहिं तुला तें सहन जहालें हीच चुकी तव सारी
पूर्व-जन्म-कृत-पुण्यपाप-बल घडवी कृति संसारीं ५१
मित्रत्व भवानंदीं केवळ तूं रतलास अधीक
मित्रप्रेमा नेणुनियां त्वां त्या न घातिली भीक ५२
मित्रप्रेमा लाधुं नये त्या ह्मणुनी तूं श्रमलास
क्रोध-विवेक-प्रवाहिं अपुलें मन दूषित केलेस ५३
स्वार्थ-परायण पुरुष असे तो हें मज माहित होतें
निज मित्राशीं कपट न करणें कर्तव्य न कां होतें ५४
ठरली नसती नि:स्वार्थी ती मैत्री कशावरून
स्वार्थपरायण कांहीं कालें उज्ज्वल रूपिं मिळून ५५
निर्मळ नसते ऐशी मैत्री ऐसें कां तुज वाटे
बाह्यरूप पाहोनी करणें पारख हें मुळिं खोटें ५६
संसारीजन मानासाठीं झटति, झटोत बिचारे
अंतीं होई अनुताप तयां लोकीं तत्वाचि सारें ५७
मच्छिष्यानें स्वीकारुं नये मार्ग असा हा पाहीं
जसा आरसा तसें असावें तत्व यांत तें कांहीं ५८
ईर्षाहंता यां न करावें कधीं उभें हृदयाशीं
वैर धरुं नये प्रियतम मित्रा जरि फसवील तयाशी ५९
इंद्रियलंपट नाहींस, तुजला वृथाभिमानहि नाहीं
द्रव्यलोभ ना तसा कुमारा, तत्व भिन्न परि पाहीं ६०
सत्यसत्यसा प्रसंग होता त्यागवृत्तिचा आला
प्रेमानें त्या आदरिलें ना, प्रमाद हा तव झाला ६१
उपकाराची प्रत्युपकारें फेड करावी ऐसें
मनांत आहे तुझ्या अझुनिहीं हें नकळे तुज कैसें" ६२
"भगवन् मजला बघवें न वरीं प्रगट जहाला रुद्र
अंतरांतल्या अंधाराशीं रजनीतमही क्षुद्र" ६३
"तृतिय परीक्षा प्रेमाची तव तींतहि तूं निष्प्रेम
अनुभव घ्यावा कसा लावुनी कैसें असतें हेम ६४

नंदा नामें ती तव दारा सखि दुर्मतिनी साची
बहिष्कार तूं तिला घातला नेणुनि गति जी तीची ६५
यौवनकाल न तिचा पाहिला अज्ञानहि तें तैसें
दया न केली तिजवरि राया सर्वाचि चुकलें ऐसें" ६६
"ऐसें जरि मीं केलें नसतें मार्ग कोणता दुसरा
कलंक लावुनि घ्यावा कां मीं सांगा मुनिहंसवरा ६७
ती पापी चंचला वशा स्त्री तिचिया समागमांत
राहुनियां निज नांव बुडविणें हें योग्य कां जनांत ६८
उदरीं घातिला असतां जरि मी अपराध तिचा राय
या राज्यामाधिं नीतिच नाहीं जन नच वदते काय?" ६९
"संसारीजन असतील त्यांनीं लज्जा सांभाळावी
न्याय करावा, खल शासावे, सत्कीर्ती मिळवावी ७०
परि असति जे संत खरे ते कधिं न परीक्षा करिती
वस्तुस्थिति काढती शोधुनि अंतिं सुगति मिळवीती ७१
अपराध न ते कधीं शोधिती, शोधिती परि तन्मूल
संत सद्गुणीं करोनि घेती विश्वपति अनुकूल ७२
संतांचा बा महिमा मोठा त्यांच्या नामरसाचे
घुटके घेतां पापें पळतीं, संतचि ईश्वर साचे ७३
संतांसाठीं सारी सृष्टि, संतांस्तव संसार,
संतांचा खेळचि सारा हा संतांविण निःसार ७४
संतसंगती सदाधरावी सुमन तयास वहावें
सहवासानें निर्वाणपदीं होउनि मुक्त रहावें ७५
गगनतारिका सागरजलकण होइल यांची गणना
संतहृदय मृदुपणा, दया, मुळिं मापायां ये पण ना ७६
सद्गुण हा नच दूर रहाणें दुष्कर्मापासून
पडला जरि उकिरड्यांत मळला तथापि न हिरा न्यून ७७
व्यसनीं राहुनि पुन्हां निराळा निर्मळ गंगाजळसा
पोहोंचे तो मनुज जाउनी चिदानंदसुखकळसा ७८
जीवनशुद्धीमधें घालिती ऋद्धीसिद्धी घाला
उन्नति पंथिच घातुक होते तीच कधीं नृप-बाला ७९
जीवनशुद्धी अंगीं असतां दया प्रेम जर नाहीं
निष्ठुरता अभिमान उपजल्याविणें न राहति पाहीं ८०

विशुद्धि कसली मग तेथें ती आभास मात्र साचा
सोनूबाई नाम असोनी करिं वाळा कथलाचा ८१
हिमालयाचीं हिमशिखरें कधिं अवलोकियलीं काय
रवि अस्ताला जातेसमयीं प्रवासांत नत काय ८२
त्या शिखरावरि सुवर्णरश्मि प्रकाशलेले दिसतां
मोद जहाला नाहिं काय बा नयनां तुझिया चित्ता ८३
शुभ्र हिमाच्या शून्य पटापरि शुद्धी प्रेमविहीन
मेघमालिका जणूं नभींची क्षणांत होय विलीन ८४
प्रेमयुता जरि असतां जीवन-सरिता प्रणालिकाच
न तरि मुद्रिका हिरा त्यागुनी जडवियली जिस कांच" ८५
राजसुताचे नेत्र अश्रुंनीं भरोनि आले पूर्ण,
वदनावाटे शब्द न वेदवें, मुनिचरणा धरि तूर्ण ८६
बोलुं लागला "भगवन् स्वामी दूर करूं नका याला
पुन्हां याचितों आपणांस मी शिष्य करा दासाला ८७
कळलें आतां शिष्य व्हावयां संपादावें काय
स्वीकारां हा दास विनय-युत चरणां-बुज नत-काय" ८८
"विनंति तव मीं स्वीकारियली, जा" ऐसें मुनि बोले
घन-जल-बिंदु प्राशुनि चातक हरिखे नृपसुत डोले ८९
मंदस्मित करि दृष्टि वळवुनी राजसुतावरि मधुरा
अनुरागाची छटा पसरवी बुद्धमुनिरवी रुचिरा ९०
रजनी सरली, कमलिनि हंसल्या, फुललीं सुमनें सारीं,
नटलि वनश्री, प्रभात समजुनि खगताति मुदिता भारी ९१
निज नगरिकडे नृपतिसुत निघे, घे निज परिवाराला
बसुनि गजावरि अतिहर्षें, घे जणुं शिष्यत्व-गडाला ९२
निर्वाण-पद-सरोरुह-रसिं-रत हो बुद्धदेव भृग
शांत वनामधिं जंबुतरुतलीं एकांतीं अति दंग ९३
काव्योद्यानीं साक्यारूपीं ताना घेई खग हा
दत्तात्रयसुत सद्रसिकांनीं परिसाव्या विनति महा ९४

## खंड तिसरा.

राजकुमारा नगरिंत शिरतां कळलें तात निवर्ते
तज्जन सारे शोकसागरीं बुडोनि गेले पुरते १

राज्यशकट तो हाकुं लागला औदार्यें न्यायानें
जो तो गाइ सुयश तयाचें प्रेमानंदभरानें २
निजमित्रास्तव बांधुनि दिधलीं दोन मंदिरें त्यानें
निजदारा जी नंदा तिजला गृहांत घे सुमनानें ३
मानखंडना तदीय झाली या कृतिनें जानिं भारी
तात्पितयाचे सेवक सारे उलट तया दरबारीं ४
जनप्रवादा पात्र जहाला नित्यचि निंदा त्याची
लोकांसाठीं त्रास घेत जो तद्गति ऐशी साची ५
जनहितकारी सुधारणा करि कानुकायदे बदली
हें न आवडे मंत्रिजनाला स्वार्थताच त्यां दिसली ६
राजतनय परि तिळहि न ढळला निज व्रतापासून
पुष्पशेज वा कंटकशेजहि समान पाउस ऊन ७
कपटव्यूहा रची तयाच्या उलट तयाचा भ्राता
खोटी नाटी कंडी उठवी कांहीं तरी ही वार्ता ८
नव्या कल्पना कल्याणार्थ न नाशास्तव या साच
जेत असे हा जुलुमी राजा स्वच्छंदीहि तसाच ९
देशामधिं कुणि गोसावी ये त्याच्या नादीं लागे
कुणास ठाउक राज्य त्यागुनि कीं हा भिक्षा मागे १०
तदांजलीनें पाणि पीतसे होऊनि अंकित अगदीं
रोग एकदा जडला अंगीं न बरा लवकर अगदीं ११
जुन्या पुरातन रीति बदलुनि स्वरूप राज्या नव दे
अंतीं याचें फल तें लाधें मी आतां तें न वदे १२
कुणि रायाला वृत्त कळविलें ठार तया माराया
गुप्तकट असे तयार झाला राज्यभागही घ्याया १३
राया त्याचें शुभाशुभ न मुळिं निर्भय असे तसाच
गुरुकिल्ली ज्या कळली त्याचें वृत्तचि ऐसें साच १४
पडो झडो वा कांहीं होवो ते मुळिं असती शांत
लाभालाभीं सुखदुःख न ज्यां वंद्य जगीं होतात १५
सांगितली अशि गोष्ट तयानें निज मित्रांना परि ती
संकटकालीं मित्राचि तारक तेचि व्यसनीं हरिती १६
मित्र ह्मणावें जया तयाशीं कपट कधीं न करावें
हृद्गत त्याला सकळ कथावें सुज्ञ सांगती भावें १७

मारेकरि ये मारायाला सशस्त्र त्या रायाला
चाल करुनिया आला तेव्हां सहज धरियला त्याला १८
होता क्षत्रिय नाम अराद क्षणीं तयास सभेंत
जैं आणियलें नृपति पुढारां शांति वरी नृप-तेज १९
जेत विचारी अरादपुरुषा "होतें कारण काय
जों निघशीं तूं सहज चिराया या नृपतीची काय" २०
"रीतीभाती सर्व बदलल्या सुधारणा करुन त्वां
राज्याचा तूं विनाश कर्ता सोडुनिया नृपतत्वां २१
जुनें सकल चांगलें दवाडिलें नवें सकल वाईट
वरिशीं ह्मणुनी तव राज्यामधिं मजला आला वीट २२
निजजन–हितकर--पथ नच जाणें तो राजाच कशाचा
असुनि जिवंतहि मेला ऐसा मृण्मय पुतळा साचा २३
ह्मणुनि तुला मी मारायाला आलों जेतनृपाळा
जसें करावें तसें भरावें लावि न हात कपाळा" २४
जेत स्वमनीं विचार करुनी वदे स्वकीय मनाच
'जराद दिसतो निरपराधि वा वेड्याची प्रतिमाच' २५
ह्मणे "शिंपायां या पुरुषाचे हेतू असती गोड"
झणीं शृंखला काढुनि त्याच्या द्या मुक्तीची जोड" २६
आश्चर्यचि ते होति शिपाई आज्ञा जशी नृपाची
सत्तेपुढती शहाणपण नच चाले उक्ती साची २७
"राहूं द्या हा माझ्या सन्निध एकटाच, हा काळ!
सर्व निघुनि जा" शिपायांस हें बोले पुन्हां नृपाळ २८
मित्र नृपाचे निघोनि गेले कांहिं शिपाइ रहाती
नाइलाज हो भय पडलें त्या साहस जघीं पहाती २९
स्तब्ध जहाला अराद पांहे नृपतिकडे डौलानें
ताठ्यानें, बेपर्वाईनें, कोण पुढें नच जाणे ३०
होई हा अपमान आपुला हें नच पाहे जेत
सन्निध त्याच्या गेला प्रेमें हाता स्तब्धचि जेथ ३१
स्कंधीं त्याच्या हात ठेउनी टक लावित नृप राहे
शब्द न वदतां प्रश्न विचारी ऐशा नयनीं पाहे ३२
दृष्टिंत त्याच्या दयाहि नव्हती धिःकारहि तो नव्हता
विजयाची ती छटाहि नव्हती जिज्ञासांशचि होता ३३

पुणे मराठी ग्रं...
४३७ ब, नारायण पेठ, पुणे २

उपदेशियलें त्याच्या गुरुनें तयास जो अनुकूळ
संत नयन अपराध न शोधिति, शोधिति परि तन्मूळ ३४
या न्यायानें निरीक्षण करीं त्याच्या गत जन्माचें
लेख वाचि वा गणीत करितो तत्पापापुण्याचें ३५
अंतःकरणद्वारें केलीं जणुं मुक्त बुद्धदेवें
दिव्यदृष्टिनें पाहे वदन-श्रीही नटे स्वभावें ३६
वस्तूंचें त्या रहस्य समजे तोही झाला ज्ञानी
सद्‌गुरुचा हा महिमा सारा कोण पूर्ण यश वानी ३७
त्या मनुजाला काय उणें जनिं जो धरि सद्‌गुरुकास
सद्‌गुरु भवसरितापतितारक, सुफलद सुरतरु खास ३८
सद्‌गुरु मूळाधार सृष्टिचें लेणें सद्‌गुरु ध्येय
सद्‌गुरु सरिता करुणरसाची सद्‌गुरु सर्व श्रेय ३९
सद्‌गुणसागर सद्‌गुरु सत्यचि सद्‌गुरु चिन्मय मूर्ति
चिदानंदघनरूप सद्‌गुरुचि चित्रकरांची स्फूर्ति ४०
मेरुगिरीला पंगुहि लंघी सद्‌गुरुवरप्रसादें
सव्यंगाला व्यंग न बाधे मुक्ति तयाला लाधे ४१
अराद-गतजन्मकर्म कळलें ज्ञानदृष्टिनें त्याला
अज्ञानें हा पतन पावला, वरि नव तृष्णा बाला ४२
नवीं बंधनें उपजत होतीं त्याचमुळें, यास्तव तीं
दृष्टिस आलें गत जन्मींचीं कर्में सारीं फळतीं ४३
चपलोघापरि रूप बदललें पाहे ऐसें राया
विश्वहि सगळें त्याच स्थानीं दिसूं लागली माया ४४
अज्ञानाचा प्रमाद अथवा तत्वांचें जें स्खलन
तद्भव दुःखें विविध यातना भोगितसे मनुजगण ४५
बहुशोकानें भरोनि आलें हृदय तदा जेताचें
स्थिति जैशी तशि वृत्ती असणें सत्हृदय-तत्वचि साचें ४६
हृदयिं धरावें त्या मनुजाला ऐसें गमे नृपाला
शुद्ध जीवनें शुद्ध होउनि वरि उन्नति पंथाला ४७
स्वप्नांतुनिया जसें उठावें ये भानावरहि तसा
सकरुण बोले निज शत्रूला हो आश्चर्यचकितसा ४८

तुजविषयीं मज कळलें बंधो आपण दोघे भ्राते
भेट म्हणीं ये भाऊ पाहूं वाहुनि सुमनां मातें ४९
घे माझें यश, अपयश तव मी प्रेमें घेतों सारें
होतां दोघे एक उरतसे भेदभाव कसलारे ५०
राजाचे जे तनुरक्षक ते झाले साशंक अती
इतुका झाला वेळ तरी करि काय अजुनिही नृपती ५१
होता जेथें जेत स्थलिं त्या आले सर्व पहात
अराद रोदन करी ठेवुनी स्कंधिं नृपाच्या हात ५२
आनंदानें नृपमुख विलसें रव्युदयें जणुं कमल
दत्तात्रय सुत चकोर वर्णी चरितचंद्र अति विमल ५३

## खंड चवथा.

जंबुतरुतळीं घालुनि आसन ध्यानस्थ बुद्ध-राय
प्रकाश पडला सभोंवताला तेजःपुंजाच काय १
जेत विमलयश अंतर्ज्ञानें जाणेहि बुद्धदेव
सर्वसाक्षि तो केवळ रवि कीं कैवल्याची ठेव २
होता ऐसा पूर्ण भरंवसा जो सुमना वाहीच
राजा आपुली कधीं प्रतिज्ञा मोडणार नाहींच ३
सुवर्ण किरणीं बाल रवीच्या पूर्वी अत्युज्ज्वलिता
सफल तरूंतुनि शिरतां रविकर होय वनश्री ललिता ४
विविध वर्णयुत सुमनें पाहुनि जणुं रत्नें स्वर्गीचीं
इंद्र उधळितां हर्षें गमतें नक्षत्रें गगनींचीं ५
जंबुतरुवरि प्रातःकालिन खगकलरव मंजूळ
किन्नर उतरति भूवरि केवळ पडली त्यांना भूल ६
विजयी वीरस्वागतार्थ नुतिपाठाचि कीं शिवगीतें
दिशा सुंदरी गाति मधुरमय वाणी जी रमवीते ७
निज तनयासह कोमल हरिणी राहि उभी गुरुजवळी
पाहुनि तिजला प्रेक्षकांचिया चित्ता शांति कवळी ८
क्रूर प्राणी सेवित होते बुद्धपदकमल भावें
आनंदानें नाचत होते हें कृत्य हो स्वभावें ९
आनंदद त्या प्रभातिं मंगल आनंदीआनंद
नंदन-वन समजुनी भुले तो स्वर्गींचा सुरवृंद १०

मंदध्वनि ऐकाया येई मनुजपदांचा कानीं
पुण्य पुरुष तो पाहे उघडुनि नयनां आत्मज्ञानी ११
विमलयशातें प्रणाम करुनि जेत पदाशिं उभाच
घनश्याम कोमलांग कृष्णापुढें धनंजय साच १२
या समयीं तो जेत एकला, नव्हतें कोणी संगें
धारण करूनी भिक्षुवेष ये गुरुपदकमलीं रंगें १३
साष्टांग नमन करी प्रभूला हात जोडुनि राहे
उभा, तोचि वर दिला प्रभूनें दिव्य दृष्टिनें पाहे १४
स्नेहपूर्णवच निघति मुखांतुनि "मत्प्रिय शिष्या राया
तुझें असो कल्याण " गुरूच्या हीच कृपेची छाया १५
नंतर दिधलें बुद्ध मुनीनें मंत्रानुग्रहदान
ऐकुनि राया निर्वाण सुखें डोलवुं लागे मान १६
हृदयीं धरिलें मुनिनें राया झालें एकचि दोघे
सुरांगना सुर उधळति सुमनें मोदें नभीं अमोघें १७
मंदमंदतर गंधयुक्त बहु वाहूं लागे वारा
मंगल मंजुल गाणें गाई वनिंचा खगगण सारा १८
शांति–देवता दाहि दिशामधिं जणूं करीत विहार
प्रभात कालिन रमणियतेचें हृदयंगम बहु सार १९
अशि रमणियता स्वर्गियशांती दिव्यप्रसाद नान
दिसोनि आला त्यास्थलिं आजच दिव्यचि गुरुवरदान २०
वास करो प्रिय वाचक हृदयीं दिव्यानंद तसाच
ती शांती तो प्रसाद अनुपम हें मागें कवि साच २१
विमल चरित हें मानस त्यामधिं हंस वसंत-विहार
सेवि मधुररस आनंदानें केवळ रसिकाधार २२

## उपसंहार.

देखें लेख सुरेख एक नवसा रम्या मनोरंजनीं
आली स्फूर्ति मनांत काव्य करुना आनंद मानूं जनीं
शोभे ग्राम कुडाल तेथ करिजो वास्तव्य त्या लेखका
वंदीं, देउं गति शिव प्रभु मला पादाब्ज भृंगाभिका २३

मुंबई,– —वसंतविहार.

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
दा. नं ७९८



# इंग्लंडमधील श्रीमंतांची राहणी.

—:०:०:—

धान्य उगवण्यासाठीं जसें धान्यच पेरावें लागतें त्याप्रमाणें लक्ष्मीसाठीं लक्ष्मीच खर्चावी लागते. एकादा श्रीमान मनुष्य आपल्या श्रीमंती थाटमाटानें न राहतां एकाद्या कद्रूप्रमाणें राहूं लागला तर कालांतरानें त्याच्याजवळची सर्व श्री नाहींशी होऊन तो खरोखरच भिकारी होईल. परंतु तोच जर आपल्या ऐपतीप्रमाणें थाटमाटानें रहात असला तर त्याच्या श्रीमंतींत एक प्रकारची आकर्षणशक्ति उत्पन्न होते व त्यामुळें पैशापाशीं पैसा धांवत जाऊन त्याला गर्भश्रीमंती प्राप्त होते.

श्रीमंतांच्या श्रीमंतीचा लाभ कोणालातरी मिळतच असतो पण ज्यांना तो मिळत नाहीं ते श्रीमंताविरुद्ध ओरड करून त्यांना उधळे ठरवितात. ही ओरड एककली-पणाची असते· श्रीमंतांनीं आपल्या सर्व संपत्तीचा उपयोग दानधर्माकडेच केला तर काय होईल ? पुष्कळ गरीबांचीं पोटें भरतील हें खरें, पण नुसत्या पोटभरण्या वरच जर जग संतुष्ट रहात असतें तर कला, कौशल्य, विद्या यांची जरूरच काय होती? इतर पशुपक्षी ज्याप्रमाणें पोट भरतात त्याप्रमाणें मनुष्यांनाही गवतावर किंवा फळांवर राहतां आलें असतें. पण मनुष्यप्राणी रसिक आहे. त्याला नऊ रसांची रुचि आहे. या रसांचे लाड श्रीमंतांच्या श्रीमंती राहणीमुळेंच पुरविले जातात. श्रीमंतांनीं जर आपली श्रीमंती राहणीच टाकून दिली तर आतांच सर्व कलाकौशल्यांना दुनियेंतून काळें करावें लागेल, रसिकतेचा नायनाट होईल, रानें व शहरें हे भेदच नाहींसे होतील व माणसें पशूपक्ष्यांप्रमाणेंच होतील.

श्रीमंतांच्या श्रीमंती राहणीचा जगाला असा महत्वाचा उपयोग आहे. इंग्लंड मध्यें किंवा इतर पाश्चात्य देशांतसुद्धां आज जी कळसास पोहोंचलेली औद्योगिक उन्नति दिसत आहे ती विशेषतः तेथील श्रीमंत लोकांच्या श्रीमंती राहणीच्या आवडीमुळेंच. विद्या, कला, कौशल्य, शास्त्रीय शोध, वगैरेंनीं संपन्न असलेला प्रत्येक देश विशेषतः श्रीमंतांचाच ऋणी असतो. द्रव्याच्या प्रमाणशीर वांटणीबद्दल वाद उपस्थित झाला ह्मणजे त्यांत विशेषतः प्रथम श्रीमंतांच्या श्रीमंती राहणी-विरुद्धच तक्रार केलेली असते. तरीपण ही तक्रार उपस्थित करणारे लोक श्रीमंतांनीं श्रीमंती राहणी टाकून द्यावी अशा मताचे नसतात हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

तत्वज्ञान्यांच्या दृष्टीला श्रीमंतीचें—व्यवहारांत आपण जिला श्रीमंती ह्मणतों व जिच्या संबंधानें वर दोन शद्ब लिहिले आहेत तिचें—मुळींच महत्व नाहीं; पण

सर्व जग एकदम तत्वज्ञानी होणें शक्य नसतें. ज्यांना तत्वज्ञान प्राप्त होतें ते त्यापासून फटकून निघतातच; पण त्याच्या अभावीं इतरांना या व्यावहारिक दृष्टीनेंच श्रीमंतीचा पुरस्कार करणें भाग पडतें. आपापल्या शक्तीनुरूप जो तो श्री संपादन करितो व त्या श्रीच्या प्रमाणांत तो श्रीमंती राहणीनें राहतो.

इंग्लंडमध्यें ज्याचें वार्षिक उत्पन्न तीस पासून चाळीस हजार पौंडपर्यंत असेल अशा प्रत्येक इंग्लिशमनला आपल्या श्रीमंती थाटामाटानें राहण्यास एखादें टुमदार गांव व भव्य वाडा असावा लागतो. लंडनचें पश्चिम टोंक अत्यंत हवाशीर मोकळे-चाकळें व रमणीय असल्यामुळें तेथील बहुतेक श्रीमंत लोक होतां होईपर्यंत तिकडेच राहतां येईल असा प्रयत्न करितात. तिकडे बंगला घेणें ह्मणजे वार्षिक खर्च सुमारें दोनपासून तीनहजार पौंडापर्यंत येतो. शिवाय त्याच्या वरवरच्या व्यवस्थेस आणि नोकरचाकरांच्या पगारास जवळ जवळ याच्या दुप्पट ह्मणजे चारपासून सहाहजार पौंड रक्कम खर्च पडते. याशिवाय शिकारखाना, पाळींव जनावरें, हत्यारें पात्यारें इतर चैनीच्या गोष्टी वगैरेकडे सुमारें पांच हजार पौंड सालीना खर्चीं पडतात. याशिवाय प्रमुख या नात्यानें मिरवितांना संभावना, देणग्या, वर्गण्या, फंड वगैरेंचे आकस्मिक खर्च उद्भवतात ते निराळेच!

घोडे, मोटारगाड्या, नौका व शर्यतीचे खेळ यांतही बरीच पौंड रक्कम खर्च होते. प्रवासाच्या व हातखर्चीच्या खर्चाची रक्कम हजार पौंडावर जाते. पण कमी नाहीं. याखेरीज नाटकें, सर्कशी वगैरेंचीं रिझर्व्ह तिकिटें, दागदागिने, वस्त्रें प्रावर्णें, दारू, धुम्रपानाचे जिन्नस वगैरेसाठीं तर सारखे चेक ( हुंड्या ) सुटतच असतात. यांशिवाय सणवार, वाढदिवस आणि शिक्षणसामग्री यांतही अनेक पौंड उडत असतात.

पुन्हां संसार वाढता व मुलबाळ झालीं ह्मणजे तर विचारूंच नये. त्यांत मुलींवर मुलीच होऊं लागल्या ह्मणजे द्रव्याची उधळपट्टीच. मुलगी वयांत येऊन समाजांत वावरूं लागली ह्मणजे तिचें लग्न ठरेपर्यंत तिजोरीची पेटी उघडीच ठेवावी लागते.

उन्हाळा व त्यांत मे महिना—ह्मणजे वसंतऋतु--हा तर इंग्लंडमधील तरुण मुलींच्या उल्हासाचा, नटण्यामुरडण्याचा व शृंगाराचा काळ. उपवर कन्यकांचे प्रेमशोधनाचे व्यवहारही बहुधा याच दिवसांत जास्त होतात. या दिवसांत श्रीमंतांच्या मुलींना प्रत्येकीं हजार बाराशें पौंडाचे नुसते कपडेलत्ते लागतात-एका प्रसिद्ध व्यापाऱ्यानें यासंबंधाची सरासरी काढून पुढील आंकडे प्रसिद्ध केले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ एक चारुचौघांत मेजवानीस, लग्नकार्यांत किंवा दरबारांत जातांना घाळावयाचा झगा-(Court Gowns) | पौं. | ७३-१०-० |
| ६ सायंकाळीं घालण्याचे ६ झगे-(Evening Gowns | ,, | १२६- ०-० |
| ३ तीन तंग-घट्ट-झगे- (Ascot Gowns) | ,, | ७८-१५.० |
| ४ बागेंत फिरावयास जातांना घालायचे चार मखमली झगे फीत वगैरे लावलेले- (Park Gowns) | ,, | ६७- ४-० |
| ४ बाजारांत जातांना घालायचे चार झगे- (Shopping) | ,, | ४२- ०-० |
| २ नाटक वगैरेस जातांना घालायचे दोन-(Opera cloaks | ,, | ४२- ०-० |
| २ घोड्यावरील रपेटीचे वेळचे-(Riding habits) | ,, | ३७-१६-० |
| १२ नाजुक व तऱ्हेतऱ्हेच्या छऱ्या १२- (Parasols) | ,, | ५०- ८-० |
| २ शहामृगाच्या पिसांचें दोन झुबके-(Boas) | ,, | ३१-१०-० |
| १०० हातमोजांचे ५० जोड-(Short Long & gloves) | ,, | ५०- ०-० |
| १२ टोप्या तऱ्हेतऱ्हेच्या-(Hats) | ,, | ६३- ०-० |
| फीत, गोंडे, पट्टे वगैरे | ,, | १००- ०-० |
| बूट जोडे इ० | ,, | ७०- ०-० |
| समुद्रकांठीं किंवा नदीकिनारीं फिरतांना घालायचे सहा झगे | ,, | ६३- ०-० |
| नौकाक्रीडेचे वेळचा ३ तीन जर्सीज | ,, | ६ ६-० |
| एक झगा व पोषाख | ,, | १२-१२-० |
| तीन टीगाऊन्स झगे | ,, | ७८-१५-० |
| घोळाचे झगे | ,, | १००- ०-० |
| | एकूण पौंड. | १०९७-१६-० |

यांशिवाय लहान लहान तट्टें, हरणें वगैरे खर्च निराळाच. मुलींना बसण्याच्या या लहान लहान बटांना केव्हां केव्हां फारच किंमत पडते. देणग्या, वर्गण्या वगैरेही यांशिवायच. उदार श्रीमंतांच्या औदार्याची जणूंकाय इंग्लंडांत चढाओढच लागलेली असते. कित्येक श्रीमंताच्या येथें तर हा खर्चाचा वार्षिक आंकडा एक कोटीपर्यंतही जातो.

पाहुणचाराच्या खर्चाकरितां तेथील सरकार सालिना पांचहजार पौंडांची रक्कम काढून ठेवतें. पण श्रीमंत लोकांत याच्या अनेकपटीनें द्रव्य खर्च होत असतें. कारण आपण जितका अधिक खर्च करूं तितका आपला अधिक नांवलौकिक होईल ही प्रत्येक श्रीमंताची हौस-तथापि पूर्वीच्यापेक्षां हल्लीं पाहुणचारांत तिकडील

पुणे मराठी ग्रंथालय
४३० ना. पा. पे., पुणे

श्रीमंत लोक जास्त खर्च करूं इच्छित नाहींत. सालीना फारफार पांचहजार. पौंड खर्च करावे अशा बेतानेंच ते वागतात. व ही काटकसर समजण्यांत येऊंनये ह्मणूनच पूर्वींच्या मेजवान्यांच्या ऐवजीं तिकडील श्रीमातांनीं हल्लीं गार्डनपार्टीस ( वनभोजनें ) ची पद्धति सुरू केली. ती हल्लीं चांगलीच रूढ झाली आहे. तथापि उन्हाळ्याच्या दिवसांतच तिचा लाभ घेतां येतो. एरव्हींच्या दिवशीं घरींच व्यवस्थ करणें भाग पडतें. व घरींच करावयाचें तेव्हां मेजवानीच करणें भाग पडत तथापि यांतही अनेक पौंड खर्ची पडतात. आणि बॉलसीझन (नाचगायनादि क्रीडेचे दिवस) आले ह्मणजे तर या चैनबाजींत हजारों पौंड खर्ची पडतात. सरासरी प्रत्येक पाहुण्यामागें दोन पौंड खर्च पडतो.

तिकडे 'वेलबेक' येथील क्रीडाभुवन सर्व ठिकाणच्या क्रीडाभुवनांत ( ball-rooms) अत्यंत उत्कृष्ट आहे. तें जमिनीखालीं असून त्याची रचना मोठी खुबीदार आहे. थोडक्यांत सुरस वर्णन करावयाचें ह्मणजे तें प्रति इंद्रभुवनाप्रमाणें शृंगारलेलें आहे. स्पेनच्या राजाराणीच्या सन्मानार्थ ड्यूक ऑफ पोर्टलंड यांस तेथें जो बॉल दिला होता त्यास दहाबाराहजार पौंड खर्च झाला असें ह्मणतात. ड्यूक ऑफ वेलिंग्टन यांनीं एकदां इंग्लंडच्या राजाराणीला तेथें बॉल दिला तेव्हां देखील असाच दांडगा खर्च झाला होता. हे दोनच काय पण तेथें वेळोंवेळीं असे अनेक समारंभ होतात व झाले त्यांच्या खर्चाचे मोठाले आंकडे मिळविल्यानेंही तिकडील श्रीमंतांना या कामीं किती अलोट द्रव्य खर्चावें लागतें याची कल्पनाही करवत नाहीं.

एकटा मनुष्य कितीही श्रीमंतीनें राहूं लागला तरी त्यास कितीसें लागणार ? तो आहारानें कांहीं बकासुर नसतो, तर त्याला खंडोंगणती खावयास लागेल किंवा शरीरानेंही अगडबंब पर्वत नसतो तर त्याला हजारों यार्ड कपडा व नोंकर लागेल ! पण फॅशनचा मोह व श्रीमंतीचा डौल मोठा विलक्षण असतो. व याचा परिणाम मोठा विचित्र होतो. फॅशनच्या नादीं लागून यापेक्षां तो चांगला असें करीत एकामागून एक तो डझनवारी कपडे खरेदी करतो व चवीच्या मासल्या-साठीं एकच तऱ्हेचे अनेकांनीं केलेले अनेक पदार्थ गोळा करितो. आणि इतकेंही करून—इतकें द्रव्य खर्चून शेवटीं त्याच्या पसंतीला त्यांतले एक का दोनच जिन्नस उतरतात व मग बाकीच्यांचा अर्थात्च अव्हेर होतो. पण ते अनायासेंच मग नोकर चाकरांच्या उपयोगी पडतात. तिकडील श्रीमंतांत हा प्रकार फार वाढलेला आहे. ह्मणजे याचा हिशेब हा कीं तिकडील श्रीमंत लोक सरासरीनें जितके जिन्नस स्वतः वापरतात त्यांच्या पसंतीसाठीं ते शेंकडोंपट जिन्नस विकत घेऊन

टाकतात. व त्याच कपड्यांसाठीं इतरांना जो एकपटीनें खर्च यावयाचा तो श्रीमंतांना त्याच्यासाठीं शेंकडोंपट खर्च येतो.

तरमग प्रत्येक श्रीमंत गृहस्थ सरासरी जास्तींत जास्ती किती किंमतीचे किती कपडे स्वतः वापरतो? असा प्रश्न साहजिक उत्पन्न होतो. त्याचा तपशील येणेंप्रमाणें–

| | | |
|---|---|---|
| एक नेहमींचा पोषाख· (Adress suit) | पौं. | १२-१२-० |
| जेवणाच्या वेळचा पोशाख-(A dinner suit) | ,, | ८- ८-० |
| दोन सकाळचे पोषाख-(Morning suits) | ,, | १४-१४-० |
| दोन आंगरखवजा पोषाख-(Frock suits) | ,, | २५- ४-० |
| दोन शिकारी पोषाख-(Scarlet hunting coats and vest) | ,, | १०-१०-० |
| दोन जोड चामडी मांडचोळणे-(Buckskin Creeches | ,, | ८- ८-० |
| दोन स्वारीचे पोषाख | ,, | १६-१६-० |
| पांढऱ्या संदूकींचे दोन जोड-(White cantoon) | ,, | १६-१६-० |
| एक-(Harris Saved suit) | ,, | ५- ५-० |
| एक लोंकरीचा पोषाख-(Club colours) | ,, | ४- ४-० |
| दोन लोंकरीचे पोषाख | ,, | ८- ८-० |
| तीन सामान्य पोषाख-(Dressy suits) | ,, | १८-१८-० |
| सेहेलाच्या वेळचे पोषाख-(Walking and Lounge suits) | ,, | १०-१०-० |
| एक डझन फॅन्सी पोषाखाचे काचवे. | ,, | १८- ०-० |
| चार जोड लेंजिंग-(Laggings) | ,, | ४- ४-० |
| एक ओव्हर कोट साधा. | ,, | ७- ७-० |
| ,, ,, लोंकरीचा. | ,, | ५२-१०-० |
| ,, ,, उबदार | ,, | ७- ७-० |
| मोटार्समध्यें घालण्याचे अर्धा डझन डस्ट कोटस्. | ,, | ३१-१०-० |
| मध्यमसा भारी ओव्हरकोट एक. | ,, | ५- ५-० |
| एक ड्रेस इनव्हरनेस. | ,, | ६- ६-० |
| दोन अस्मानी पोषाख, नौका क्रीडेचे. | ,, | १०-१०-० |
| एक वॉटरप्रुफ ओव्हरकोट. | ,, | ३- ३-० |
| | एकूण पौं. | ३०६–१५–० |

ही एक साधारण यादी आहे. बिनचुक व पूर्ण यादी मुळींच होणें शक्य नाहीं. कारण श्रीमंतांच्या अनेक लीला व त्याप्रमाणें प्रत्येकाला निराळा पोषाख ठरणार. शिवाय प्रवासाचा पोषाखही एक असणें शक्य नाहीं. कारण जसा देश तसा त्याच्या प्रवासाचा पोषाख बदलणार ! तेव्हां हे खर्चेतर निराळेच व शिवाय टोप्या, बूट, जोडे वगैरेंचा खर्च.

श्रीमंतांनीं श्रीमंती थाटानें राहिलेंच पाहिजे. कारण तें त्यांचें भाग्य आहे. तें भोगल्यानें त्यांची भाग्यदेवता त्यांजवर खुष राहते व ती त्यांच्या भाग्यांत अधिक लक्ष्मीची अथवा श्रीमंतीची भर टाकते आणि त्यांचें तें भाग्य देशाचें व देशांतील लोकांचें भाग्य वाढविण्यास उपयुक्त होतें हें आरंभीं सांगितलेंच आहे. तथापि श्रीमंतीची फाजील ऐट व फॅशनचा अनिवार मोह ह्यामुळें तीच भाग्यदेवता रुष्ट होते व त्यामुळें देशाची व देशांतील लोकांची अवनती होते. तिकडील तत्ववेत्ते हें जाणून असल्यामुळें वेळोंवेळीं जागृत राहून यासंबंधाच्या लोकस्थितीचें सारखें निरीक्षण करीत असतात व आपल्या विचिकिच्छेनें लोकांस जागें करीत असतात. केव्हांही तिकडील पत्रें, मासिकें पहा, त्यांत यासंबंधाची चर्चा मधून मधून असलेलीच वाचकांना आढळेल. श्रीमंतांचे असले हे थाटमाट, ऐषआरामाचीं साधनें, फॅशनचा बडेजाव इत्यादि गोष्टींची तेथें सारखी वाढ होत असूनही तेथील राष्ट्रीयवैभव सारखें वाढतें आहे व त्याच्या आनंदमय छायेंत श्रीमंतांना आपले थाटमाट भोगावयास मिळून गरीबांना कामकाज मिळतें व सर्वत्रांना सुधारणानंद भोगावयास सांपडतो. असल्या भाग्यशील इग्लंडला व तेथील अखंड दक्ष व विचारवंत लोकांना अनेक धन्यवाद असोत असें कोणबेरें ह्मणणार नाहीं ?

---

## मृदुलामृणाल गीत.

[आंग्लकवि गाल्ड्स्मिथ् यांच्या 'एड्विन् आणि एंजानिया नामक काव्याचे आधारें.]

**चाल**–चंद्रकांत राजाची कन्या०

"निर्जन वन हें, सदया साधो, दावा मार्ग मला,
जळति मशाली धगधग कीं त्या जावा वसतीला. ।
दमलों चालुनि, वाटहि चुकलों, पायहि लटपटती,
विशालता ही भासवि पळती तरुहि मजपुढती." ।

"हां! हां! तिकडे जाउं नको तूं" गोसावी वदला
"मायावी हा खेळ भयंकर भूतांचाच मुला.।
घडते माझे करिं कधिं थोडी फार अतिथिसेवा,
निर्धनतेचें स्वागत आणी जवळ बंधुभावा.।
पडली रजनी, पर्णकुटीला चल, भोजन वर्निचें
सेवुनि साधें, घे सौख्याला वल्कल शयनाचें.।
हरिणादिक जे बागडती मृग येथें आनंदें,
वधीं न त्यांनां, खेळूं देतों प्रेमें स्वच्छंदें.।
मधुर फळें हे तरुवर देती मूळें कंद मला,
बनवल्ली या सत्वाधारा, निर्झर विमल जला.।
चिंतनीय हा संसार नसे, दे सोडुनि चिंता,
प्राणधारणापुरतें थोडें त्याचा प्रभु दाता." ।
गगनांतूनी हळुहळु भूवरि दंव बिंदू गळती
शब्द तसे हे साधुमुखांतुनि मृदु मंजुल पडती.।
त्या प्रेमाचा आतिथ्याचा करुनी स्वीकार,
निघे तयासह युवक हळू हळु काढि न उद्गार.।
अंतर्भागीं त्या विपिनाच्या आश्रम शांत असे,
श्रांत जनांचा आश्रय, गरिबां कामधेनु विलसे.।
स्थल एकांतीं दारिद्र्याचा मूर्तिमंत वासः
द्वार कशाला? काय मिळे हो येथें चोरास!।
सायंकाळीं स्वगृहीं जाती जन विश्रांतीला,
इकडे झटतो यति अतिथीचे श्रम वारायाला.।
आग्रह करुनी वाढी पाहुण्या फलमूलाशन तोः
सस्मित सांगुनि देवमुनींच्या गोष्टी, रंजवितो.।
शेजारींच्या तरुवरि बसुनी किलबिल खग करिती,
मठीं येउनी नाचति, खाती, मृदु मंजुळ गाती.।
परि अतिथीचें प्रसन्न होइ न मन, सगळे थकले,
धुमसत हृदयीं दुःखानल त्या, नयनिं अश्रु आले.।

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब, नारायण पेठ, पुणे २

म्लान तयाची मुखचर्या ती बघुनी कळवला,
प्रश्नकरी यति "कष्टी कां तूं? होई काय तुला?
गेली पहिली श्रीमंती ती ह्मणुनी हळहळसी?
स्नेही फिरले? कुणि युवती वा धिक्कारी तुजसी?
संपत्तीचीं क्षणिक सुखें तीं नाशवंत सारीं,
घालुनि मोहा गुंगवितीं तीं मनुजा संसारीं.
निर्धन गेहीं मित्रत्वाचें साधें रूप खरें,
लक्ष्मी दावी नानापरिनें प्रेमाचे नखरे.
प्रणय जाहला विषयाचि चेष्टचा या ललनांला,
स्वर्गि न येथें, भूषवि एका चक्रवाक युगुला!
लाजुं नको तूं, दुःखा आंवर, नारी या कुटिला,
धिःकारीं त्यां" ह्मणतां आली लाली त्या गालां.
मुखावरी त्या सौंदर्याची छवि नूतन पडली,
मिरवी जैसी मोहक चंचल गगन उषःकालीं.।
लज्जाविनता दृष्टि, स्वर तो धडधड हृदयाचा
सांगे कीं ही तरुण कुमारी धरि वेष नराचा!
"हरहर दैवा! आगंतुक या स्वर्गभुवरिं आलें:
क्षमाकरा या अभागिनीला, अपराधी बाले!
करुणा येवो दीन मुलीची! वेडी प्रणयानें!
शांति पळाली भिववि निराशा भेसुर वदनानें!
गंगातीरीं राहत आहे बहु वैभवशाली
एक धनिक त्या बहु नवसांनीं कन्या ही झाली.।
एकुलती मी प्रिय तातांनां, दुसरा तत्प्राण,
**मृदुला** वाटे त्यांस गुणांची रूपाची खाण.
उपवर होतां वरावया मज आमित पुढें आले,
सौंदर्याला स्तविती माझ्या, अत्युत्कट झाले.।
धनचुंबक ते दावित आशा सौख्याची जमले,
**मृणाल** त्यांतचि परि वाणीनें प्रेमा नच बोले.

वस्त्रांभरणें साधीं, नव्हतें धन, ना अधिकार,
परि सद्विद्याशील तयाचें आवडलें फार. ।
संनिध माझे बसुनी जेव्हां प्रणयगीत गाई,
श्वासें वासित पवन, निनादें डोलतसे राई !
त्या हृदयाच्या निर्मलतेची ये सर कोणाला ?
आम्रतरूच्या नवमंजरिला कीं दंवबिंदूला ?
कोमलता ती, शुद्धपणा तो, त्या हृदयीं भरला,
चंचलतेचा त्यांतिल वांटा मजसाठीं उरला. ।
ज्ञान तयांचें, सहृदयता ती, ते प्रेमळ भाव
पाहुनि दिधला अत्यानंदें हृदयीं त्यां ठाव. ।
अंतरिं आलें भरतें प्रेमा, परि मी अभिमानें
दिसूं न देईं कांहीं त्याचीं बाहेरी चिन्हें!
निष्ठुरता ही पाहुनि माझी कंटाळुनि गेले
निघुनि, वाटे भलतें सलतें जीवाला केलें! ।
परि हें माझें पातक, मरणा मरणाची शिक्षा
घेतें त्यांनीं घेतली तशी मृत्यूची दीक्षा.
दीन अनथा अनुतापाचे सोशित मी चटके,
करीन त्यांनीं मजसाठीं जें केलें त्या घटके."
"हां! हां!" ह्मणुनी यतिराज तिला हृदयाशीं कवळी,
कोपुनि बघतां पर पुरुष न तो परि **मृणाल** जवळी !
"मृदुले, नयनां उघडुनि पाहें, मोहिनि तूं पाहें:
चिरलुप्त तुझ्या भेट **मृणाला**, तोच येथ आहे! ।
धरुं दे हृदयीं गाढ तुलाया, दे सोडुनि चिंता,
राहुं सुखानें, क्षणहि वियोगा अवकाश न देतां.
परस्परांनां कधिं न विसंबूं, प्रीती गाढ अशी,
कीं **मृदुलेच्या** अश्रुजलानें दाह **मृणालासी**"

मुंबई, —**विनयविहारी.**

## वासवदत्ता आणि उपगुप्त.

———:———

महात्मा गौतम बुद्ध यांच्या वेळीं मथुरेंत वासवदत्ता नांवाची एक गणिका होती. ती खरोखरच आपल्या नांवाप्रमाणें (वासव ह्मणजे इंद्रानें आणि दत्ता ह्मणजे दिलेली) स्वर्गलोकींची जणूं काय अप्सराच होती. तिचें लावण्य लोकोत्तर होतें, शब्द मोहक होता आणि गणिकेच्या पेषाला ज्या गोष्टी अवश्य लागतात त्यांतही ती परिपूर्ण होती. स्वभावानें जरी ती चारुदत्ताच्या वसंतसेनेसारखी सात्विक व गुणाग्रही प्रेमाची साक्षात् मूर्ति अशी नव्हती तरी पण त्या वेळच्या गणिकावर्गांत तीच नांवाजण्यासारखी होती.

एके दिवशीं बुद्धाचा एक उपगुप्तनांवाचा तरुण शिष्य सहज तिच्या पाहण्यांत आला. त्याचें तें तपस्तेज व तारुण्यानें मुसमुसलेलें शरीर, तसाच बोलण्या चालण्यांतील ठाकठीकपणा वगैरे गोष्टी पाहतांच तिचें मन त्याजवर बसलें. आणि तो ह्मणजे खरोखर कोणाच्याही डोळ्यांत भरण्या-सारखीच मदनमनोहर मूर्ति होता. मदनाला श्रीशंकरांनीं जाळून अनंग केल्यापासून तो जो एक सारखा गुप्त होता तोच सांप्रत जणूं काय उपगुप्त ह्मणून अवतरला आहे कीं काय असेंच त्याच्याकडे पाहणाराला वाटावें असें त्याचें सौंदर्य होतें. असें सुंदर नररत्न तपश्चर्या करीत असलेलें पाहून तिला मोठें आश्चर्य वाटलें. पूर्वजन्मींचें स्मरण ठेवून या जन्मीं प्रथमपासून त्यानें वैराग्य धारण केलें असावें असेंही तिला वाटे.

उपगुप्तासाठीं वासवदत्ता मनांत झुरूं लागली. उठतां बसतां, खातां पितां, झोपेंत स्वप्नांत तिला सारखा उपगुप्ताचाच ध्यास लागून राहिला. एरव्हींच्या व्यवहारी लोकांप्रमाणें तो जर एखाद्या गृहस्थाश्रमी मनुष्याचा मुलगा असता तर काय वाटेल तें करून तिनें त्याला गांठलें असतें व आपलें हृद्गत त्याला निवेदन करून त्याची प्रीति संपादिली असती. परंतु तापसी व्यक्तीला स्त्रीजाति स्वभावतःच भीत असते. त्यांतून हा तापसी ह्मणजे कांहीं असा तसा साधारण नव्हता. तो बुद्धाचा शिष्य होता. त्यामुळें त्याची भेट कशी घ्यावी, कोणच्या भाषेनें त्याच्याशीं बोलावें, कसल्या लाघवांनीं त्याचें मन आपल्याकडे ओढून घ्यावें, आणि कसली सेवा करून त्याची प्रीति संपादावी, हे तिला, ती जातीचा गणिका असूनही प्रेमपात्र तपस्वी असल्यानें, मोठ्या महत्वाचे व बिकट कोड्यासारखे प्रश्न होऊन पडले.

आज या रीतीनें तर उद्यां त्या रीतीनें आणि तिसऱ्या दिवशीं आणखी तिसऱ्या रीतीनें असे एकामागून एक अनेक प्रयत्न ती करूं लागली. परंतु एकही सिद्धीस जाईना. एकादी गोष्ट जसजसी अधिक दुर्मिळ होते किंवा वाटूं लागते तसतशी तिच्या लाभासाठीं तिजबद्दलची प्रीति अधिकाधिक दुणावते असा नियमच आहे त्याप्रमाणें वासवदत्तेलाहीं उपगुप्ताचें अत्यंत वेड लागून गेलें. ती त्याचें अधिकाधिक ध्यान करूं लागली. तिच्या मनाच्या डोळ्याला तो मूर्तिमंत दिसूं लागला, पण मानसपूजा चांगली साधूं लागली ह्मणजे ध्येय मूर्ति प्रत्यक्ष कधीं भेटेल अशी उत्कंठा जास्त बाळावते. त्यामुळें तिला दुसरें कांहींएक रुचेनासें झालें. आपल्या प्रयत्नांची ती शिकस्त करूं लागली. पण यशाची आशा दिसेना. एकामागून एक सगळेच प्रयत्न निष्फळ होऊं लागले ह्मणजे मनुष्य त्रागयानें एकदम साहसासही प्रवृत्त होतो. या मनुष्यस्वभावधर्माप्रमाणें वासवदत्तेनेंही मग सगळे मर्यादेचे, विनयाचे व शिष्टाचाराचे सर्व प्रयत्न सोडून देऊन प्रेमोन्मादांत उपगुप्ताकडे एकदम एक दासी पाठवून बोलावणें धाडलें.

इकडे उपगुप्ताला यासंबंधाचा मागमूसही नव्हता. तो पुष्कळदां वासवदत्तेच्या आंगावरून गेला असेल; पण आपल्या धर्मकृत्यावांचून दुसरीकडे ज्याचें मनच नाहीं तो आपल्याला कोण भेटतें, कोण आपल्याकडे पहातें वगैरेकडे कशाला लक्ष देईल? कुत्रीं भुंकतात किंवा नाहींत हें कांहीं एक न पाहतां हत्ती आपल्या चालीनेंच जातो तसेंच सिद्धांचें अथवा सिद्धशिष्यांचें आचरण असतें. कोणी यांच्याकडे पाहो, हंसो कीं टीका करो हे तिकडे ढुंकूनही न पाहतां आपल्या कृत्यांत मग्न असतात. उपगुप्ताची रोजची दिनचर्या यथायोग्य रीतीनें चालली होती. मानसशास्त्रांतर्गत वशीकरणाच्या नियमाप्रमाणें एकाद्या विषयीं आपलें मन एकाग्र करून जोराचा विचार सोडला तर त्याचा समोरच्यावर परिणाम होतो अशी हिप्नॉटिझम ( मोहनतंत्रविद्या ) वरील पुस्तकें सांगतात. व त्याप्रमाणें उपगुप्तासंबंधानें वासवदत्तेच्या मनानें आपल्या सर्वशक्ती एकवटून सज्जही केल्या होत्या, मग त्यांचा उपगुप्ताच्या मनावर कांहींच परिणाम कसा झाला नाहीं हें कसें ह्मणून कोणीं विचारल्यास याचें उत्तर हेंच कीं अहंभाव विरहित शुद्ध मनानें निरपेक्ष तपश्चर्या करणाऱ्या व्यक्तींचीं मनें वज्रासारखीं असतात. त्यांच्यावर असल्या कोणत्याही तंत्रांचें कार्य होऊं शकत नाहीं.

एके दिवशीं उपगुप्त आपलीं नित्यकर्में आटोपून नुकताच बसला असतांना वासवदत्तेची दासी त्याच्याकडे आली व साष्टांग प्रणिपात करून नम्रतेनें हात जोडून पुढें उभी राहिली. तें पाहतांच कोण, कां आलीस? वगैरे प्रश्न उपगुप्तानें

करितांच त्याला तिनें वासवदत्तेची विज्ञप्ती निवेदन केली. आपल्या वर वासवदत्तेचें मन बसलें असून ती आपल्या भेटीसाठीं उत्सुक आहे हें ऐकून त्याला प्रथम दर्शनींच मोठें आश्चर्य वाटलें. एकादा सामान्य किंवा नवशिक्या तपस्वी असतात तर त्यानें आपल्या शीघ्रकोपी स्वभावाचें लागलीच प्रदर्शन करून तिला धुडकावूनच लाविलें असतें. परंतु उपगुप्त भगवान् बुद्धाचा भक्त अगर शिष्य आणि बारीकसारीक हिंसेच्याही विरुद्ध; अशा 'अहिंसा परमोधर्मः' या तत्वावर स्थापन झालेल्या धर्माचा अनुयायी, त्यामुळें न रागावतां उलट शांतपणानें तो आपल्या मनाशीं विचार करूं लागला कीं, "वासवदत्तेचें मन माझ्यावर बसण्यासारखें स्पृहणीय माझ्यांत काय आहे? ती विलासी, मी उदासी. एकमेकांच्या वृत्ती अथवा प्रिय वस्तु अगदीं विरुद्ध! तिला हवें तें मला नको व मला हवें तें तिला नको. असें असून ही ह्मणते कीं, तिचें मन माझ्यावर बसलें आहे!"

राजापेक्षां राजाचा हुजऱ्याच चतुर व प्रसंगावधानी असतो, व्यापाऱ्यापेक्षां त्याचा गुमास्ता काबील असतो. त्याप्रमाणें गणिकांपेक्षां त्यांच्या दासी मोठ्या तरबेज असतात. वासवदत्तेच्या दासीनें उपगुप्त विचारांत पडलासें पाहतांच आपल्या वर्मी परंतु युक्तीच्या शद्बांनीं त्याच्या विचाराला योग्य वळण दाखविण्याचा प्रयत्न आरंभिला. ती ह्मणाली, भगवन्, आपण सिद्ध ह्मणजे जगाचेच काय पण जगतकर्त्या ईश्वराच्याहि सर्वस्वाचे मालक. आपल्या जवळ वाटेल तसला याचक आला तरी त्याची वाटेल ती याचना तृप्त करण्याचें सामर्थ्य आपल्यांत आहे. मग माझ्या वासवदत्तेच्या प्रेमयाचनेची ती कथा काय?

दासीच्या या मार्मिक भाषणाचा उपगुप्ताच्या मनावर एकदम परिणाम झाला. त्याच्या विचारापुढें जी संशयाची एक तटबंदी पसरलेली त्याला दिसत होती तींतून एकदम बाहेर पडण्याचा मार्ग त्याला स्पष्ट दिसूं लागला. तो उल्हासानें दासीला ह्मणाला, "तूं ह्मटलेंस तें अक्षरशः खरें. इतर ग्राम्य, विषयलोलुप लोकांप्रमाणें आमच्या जवळूनही जर याचक विन्मुख जाऊं लागला तर त्याच्यांत व आमच्यांत फरक तो काय राहणार?" दासीचें मन एकदम उल्हसित झालें. आल्यासारखें आपलें काम यशस्वी झालें हें पाहून तिला अत्यंत आनंद झाला व कृतज्ञतेनें तिनें एकदम हात जोडले, तोंच उपगुप्त ह्मणाला, "जा, वासवदत्तेला सांग कीं, तुझी विनंति मला मान्य आहे. परंतु ती पूर्ण करण्याची योग्य वेळ येतांच मी तुझ्या भेटीला अवश्य येईन."

उपगुप्ताच्या ह्या भाषणानें दासीचें समाधान होऊन ती गेली खरें; पण त्यांत

गर्भित अर्थ अगदीं दुसराच होता. तिनें आपल्या मायावी लाघवाच्या जाळ्यांत त्याला अडकविण्याचा प्रयत्न केला; पण अंधःकाराच्या जाळ्यांत जसा सूर्य कधींही अडकविला जात नाहीं किंवा सोन्याचा वरून कितीही कीस काढला किंवा त्याचें हृदय फोडून त्याचे शतधा तुकडे केले तरी तें आपला सोनेपणा एक अणूभर देखील सोडीत नाहीं तसेंच अग्नीला हलविल्यानें विझून जाण्याऐवजी तो पुन्हां जागृत होऊन सतेज होतो त्याप्रमाणेंच आपल्या फायद्यासाठीं वासवदत्तेच्या दासीनें उपगुप्ताचें सिद्धपणाचें वर्म बोलून दाखवून त्याला आपल्या मायेंत अडकविण्याचा प्रयत्न केला पण त्याचा परिणाम त्याच्यावर तिच्या धारणेंप्रमाणें न होतां तो उलट डंवचला गेला. आणि त्याचें हृदय मलिन न होतां उलट अधिक प्रखर झालें. त्याला आपल्या सिद्धपणाच्या खऱ्या उपयोगाची जाणीव झाली. उपगुप्ताच्या नकळत वासवदत्ता त्याच्यापासून दूर होती तोंपर्यंत तिला मदनाच्या चेष्टा करितां आल्या; पण आतां निरोपाच्या रूपानें तिनें उपगुप्ताच्या अंतःकरणाला स्पर्श केला मग काय? अग्नीला दुसऱ्या पदार्थांचा स्पर्श होतांच तो जसा त्याला आपल्याप्रमाणें करून सोडतो त्याप्रमाणें वासवदत्तेलाही आपल्यासारखी तद्रूप करण्याचा त्यानें निश्चय केला. परंतु थोर लोक आपल्याला जें काय करावयाचें त्याबद्दल आधीं विनाकारण बडबड करून फुकट तोंडाच्या वाफा न दवडितां प्रत्यक्ष तें करूनच दाखवितात, या धोरणानेंच उपगुप्तानें थोडक्यांतच पण गर्भित अर्थप्रचुर असेंच उत्तर वासवदत्तेला पाठविलें. तें कळतांच तिला आनंद झाला व आपलें इच्छित पूर्ण होणार असें वाटलें. परंतु वस्तुस्थिति अशी होती.

वासवदत्तेला आशेचें जीवन मिळालें. एकदिवस गेला तेवढा कमी झाला. आपल्या प्रियकराच्या भेटीची वेळ तितकी जवळ आली अशा समजुतीनें ती एकामागून एक दिवस मोजीत चातकाप्रमाणें उपगुप्ताची वाट पहात काळ कंठूं लागली. परंतु, एकादी इच्छित गोष्ट प्राप्त होणार अशी खरोखर आशा असली तरी मध्यंतरीं जर अवकाश फार असला तर प्रतिदिवशीं-नव्हे प्रत्येक क्षणास ती आशा अधिकाधिक उत्कंठित होऊन अत्यंत उतावळी होते व त्यामुळें ते एकेक क्षण त्या व्यक्तीला युगाप्रमाणें वाटूं लागतात. वासवदत्तेचीही अशीच अवस्था झाली. जसजसे जास्त दिवस जाऊं लागले तसतसे तिला ते काळासारखे भासूं लागले- 'उपगुप्ताची भेट कधीं होईल. इतके दिवस झाले तरी अजून मेली ती वेळ कशी येत नाहीं म्हणून ती काळाला केव्हां केव्हां

शिव्याही देऊं लागली. राहिलेल्या अवधींतला एक क्षणही पुढें कंठणें तिला असह्य झालें. तिच्यानें राहवेना. मन चिंती तें वैरीही ना चिंतीं! एकावर एक अनेक तरंग मनांत येऊन ती संशयसागरांत गटंगळ्या खाऊं लागली. शेवटीं कंटाळली तेव्हां उपगुप्त येऊन भेटेल कीं नाहीं याचाच तिला भरंवसा वाटेना. त्याच्या वचनांवरचा तिचा विश्वास डळमळूं लागला. एकदां एक वाटावें तों दुसऱ्यांदा दुसरीच कल्पना यावी, तिसऱ्यांदा तिसऱ्या विचारानें सर्वांचेंच निरसन करावें असें चाललें. ती वैतागली. उपगुप्त येऊन भेटल्यावांचून आपला हा हृद्रोग नाहींसा होणार नाहीं असें तिला वाटूं लागलें. व मग एकक्षणही विचार न करितां तिनें आपल्या दासीस पुन्हां उपगुप्ताकडे पाठविलें.

दासीनें पुन्हां आदरानें उपगुप्ताकडे जाऊन वासवदत्तेची सर्व हकीकत त्याला निवेदन केली व ह्मणाली, "वासवदत्तेला आपल्यापासून द्रव्याची मुळींच अपेक्षा नाहीं. ती आपल्या प्रेमाची भुकेली आहे. व सांप्रत त्या भुकेनें तिला अत्यंत व्याकूळ केलें आहे." हें ऐकून उपगुप्त किंचित हंसला व ह्मणाला, "तूं सांगितलेल्या हकीकतीवरून मला वासवदत्तेच्या हृदयाची चांगलीच परीक्षा झाली. मदनव्यथित प्रेमी जनांचीं प्रेमळ हृदयें अशींच असतात. तूं वासवदत्तेला असें सांग कीं, उपगुप्तापासून तुला जशी द्रव्याची अपेक्षा नाहीं तशी उपगुप्तही तुला द्रव्य देण्याची इच्छा धरीत नाहीं. प्रेमी मनुष्याला द्रव्याच्या लालचेवर संतुष्ट करणें ह्मणजे त्या प्रेमाचीच प्रतारणा करणें होय. प्रेमीजनांना प्रेमाचीच भेट पाहिजे. तूं उपगुप्ताचें प्रेम मागितलेंस हें तुझ्या प्रेमळपणास फार भूषण आहे. मी एकदां जें वचन अथवा अश्वासन दिलें आहे तें अक्षरशः खरें आहे. माझी योग्य वेळ येतांच मी तें पूर्ण करून दाखवीन."

उपगुप्ताचें हें भाषणही त्याच्या विवक्षित गुह्यार्थानेंच भरलेलें होतें हें सांगावयास नकोच. दासीची निराशा झाली. तिनें परत येऊन वासवदत्तेला तें श्रुत केलें तेव्हां तिचीही निराशा झाली. आपला कर्मभोग अद्यापि पुष्कळ बाकी आहे, अजून आपल्याला प्रेमाची तपश्चर्या पुष्कळच करावयाची आहे असें तिनें आपल्या मनाचें तात्पुरतें समाधान करून घेऊन 'उपगुप्त, उपगुप्त' असें स्मरण व चिंतन करीत ती पुन्हां काळ कंठूं लागली.

परंतु असली प्रेमतपश्चर्या तिकडून होऊं देण्याऐवजीं विधात्यानें तिच्या कपाळीं आणखी तिसरीच विटंबना लिहिलेली होती. कोणी एक मोठा श्रीमान् शिल्पकार धंद्यानिमित्त मथुरेंत आला असतां दैववशात् वासवदत्ता त्याच्या कुठें नजरेस पडली. ती जाणूनबुजून गणिकाच. तिची कीर्ति ह्या शिल्पकार व्यापाऱ्यानें पूर्वी

ऐकलेली होतीच पण प्रत्यक्ष पाहण्याची गोष्ट निराळी असते. येथें त्यानें ती प्रत्यक्ष पाहतांच तिच्याविषयीं अभिलाषित होऊन तिच्याप्राप्तीचा त्यानें प्रयत्न चालविला. द्रव्याच्या साह्यानें मनुष्याला काय करितां येणार नाहीं? त्यानें चारी· बाजूंनीं तिच्या भोंवतीं आपलें जाळें पसरलें. तिच्यामागें अनेक भुरडभुंगे लाविले.

वासवदत्ता गणिका होती तरी तिला आतां उपगुप्तावांचून सर्व जग नीरस होतें. ती त्या व्यापाऱ्याच्या प्रेमाच्या मागणीला एक सारखी नकारात्मक उत्तरें देऊन राहिली होती· तथापि यांत आपल्याला शेवटपर्यंत टिकाव धरतां येईल कीं नाहीं याची तिला पुढें शंका वाटूं लागली· यांतून आपलें सरंक्षण कसें करावें व कसें सुटून जावें ही तिला मोठी पंचाईत पडली. एकामागून एकेक दिवस तिला अधिक धोक्याचा वाटूं लागला व पुढचा दिवस मागच्यास बरा ह्मणवूं लागला. शेवटीं ती अत्यंत वैतागली. कांहींतरी साहस केल्यावांचून यांतून आपली सुटका होणार नाहीं·अशी खात्री वाटून ती तशा प्रयत्नास लागली तिनें बाह्यात्कारीं त्याचें प्रेम कबूल केलें व प्रथम आपल्या भोंवतालचा त्रास कमी केला. त्या व्यापाऱ्याशीं संघट्टन वाढत चाललें· तो अगदीं प्रेमवेडा होऊन गेला होता पण ही त्याच्याकडे ‘उपगुप्तावरील आपल्या प्रेमांतलें एक विघ्न’ या द्वेषदूषित दृष्टीनें पहात असे. अखेरीस तिनें आपला द्वेष साधला· तो प्रेमवेडा बरोबर डावांत आणून तिनें त्याचा खून करविला आणि त्याचें प्रेत उकिरड्यावर पुरून टाकलें· वासवदत्तेला आपण निर्भय झालों असें वाटलें.

परंतु पातक–तें कोणत्याही चांगल्या हेतूसाठीं केलें असतें तरी तें पातकच त्याचें प्रायश्चित भोगावेंच लागतें. हेहीं इथेंच या हाताचें त्या हातावरच भोगावें लागतें. तशी वेळ आली·

तो नाहींसा झालेला पहातांच त्याच्या नातलगांत व इतर मंडळींत अर्थातच एकदम खळबळ उडाली. ते शोधाशोधी करूं लागले. गुन्ह्याचा शक सर्वस्वी वासवदत्तेवर यऊं लागला. गांवचे नदीनाले, तळीं, विहिरी, खड्डे, उकिरड्यांचे ढीग–मारून सर्वांची तपासणी सुरू झाली. त्यांत वासवदत्तेच्या वाड्यामागील उकिरड्यांत तें प्रेत सांपडून आलें. झालें मग काय ? वासवदत्ता कबज झाली. न्यायाधीशापुढें तिला चौकशीसाठीं उभें केलें. चौकशीअंतीं वासवदत्तेवर गुन्हां शाबित झाला· न्यायाधिशांनीं तिचे हातपाय व नाक कान कापून तिला स्मशानांतल्या खाईंत टाकून देण्याची शिक्षा सांगितली. लागलीच शिक्षेची अंमल बजावणी झाली. उपगुप्त उपगुप्ताच्या ठिकाणीं राहिला, तिचें

 पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब, नारायण पेठ, पुणे २

विरहदुःख व प्रेमही कोठच्या कोठें आणि आतां शेवटीं असल्या भयंकर व विद्रूपस्थितींत खितपत पडण्याचें तिच्या कपाळीं आलें !!

वासवदत्ता आतां आपल्या इंद्रभुवनतुल्य विलासभवनांत नसून स्मशानांत गवताच्या शय्येवर पडली आहे. तें अप्सरेसारखें सौंदर्य आतां पार लयास गेलें असून स्मशानांत येणाजाणाऱ्या लोकांच्या भीतींचा व किळसाचा विषय होऊन राहिली आहे. फुलें, परिमळद्रव्यें यांच्या ऐवजीं रुधिर, मांस यांत लोळण्याचें तिच्या दैवीं आलें आहे. ज्या तोंडावर माशीही ठरण्याची मुष्कील त्यावर आज अनेक माशा, चिलटें, डांस, गोचिड यांचा सुळसुळाट झाला आहे. ज्या आंगावर मौल्यवान वस्त्रें असावयाचीं तें आंग आज केवळ एका पटकुरानें आच्छादलें आहे. फक्त दैवाची कृपा इतकीच कीं, तिची ती दासी आपल्या स्वामीभक्तीस जागून वासवदत्तेच्या खालेल्या अन्नास स्मरून तिच्या बरोबर स्वतःही स्मशानवास पत्करून राहिली आहे व कंदमूळावर आपलें व आपल्या अन्नदात्रीचें देहसंधारण करून कावळ्या गिधाडांच्या टोंचाटोंचीच्या त्रासापासून तिचें सरंक्षण करीत आहे ! !

आतां कसला तो उपगुप्त त्याच्या विषयींच्या आशा व त्यावर उभारलेलीं मनोराज्यें ! तोंडावर थुंक म्हटल्यानेंही कोणी थुंकणार नाहीं असल्या प्राप्त झालेल्या स्थितींत मनानें देखील उपगुप्ताच्या हृदयाची भेट घेण्याची तिला इच्छा होईना. आपण काय इच्छीत होतों, त्याच्या सिद्धिसाठीं काय साहस करायला प्रवृत्त झालों व त्याचा परिणाम काय झाला याचें पर्यालोचन करीत निरंतर पश्चातापांत विव्हळण्यापलीकडे तिला आतां कांहीं राहिलें नव्हतें. जगांत परमेश्वर आहे कीं नाहीं याबद्दल विद्वान लोकांचे केवढे वाद ? शेवटीं 'नेति नेति' म्हणून त्यावादाचा संदिग्ध निकाल; परंतु वासवदत्तेला यावेंळीं त्याचें पुरें पुरें ज्ञान व खरें खरें दर्शन होत होतें. ती सारखी त्याच्याकडे लयलावीत पडून त्याची करुणा भाकूं लागली.

पश्चात्तापयुक्त शुद्धअंतःकरणानें हांक मारल्यावर देव धांवून येण्यास काय उशीर ? देवांच्या नशीबीं देखील असले प्रसंग वारंवार येत नसतात. वासवदत्तेला देव पावला. वासवदत्तेची भेट घेण्याची योग्य वेळ झाली अशी त्यानें लागलीच तिकडे उपगुप्ताच्या अंतःकरणास प्रेरणा दिली. मरतां मरतां दुरून तरी उपगुप्ताचें शेवटचें दर्शन घ्यावयास मिळावें अशी तिची फार इच्छा होती तों उपगुप्त ऐनवेळीं तेथें तिचा तपास काढीत काढीत येऊन पोंहोंचला.

त्याला आलेला पाहतांच वासवदत्तेनें घाईघाईनें दासीस आपली च्छिन्न-विच्छिन्न काया वस्त्रानें झांकूत टाकण्यास सांगितलें. एकाडोळ्याखेरीज बाकीचें सर्व आंग दासीनें झांकून टाकिलें. उपगुप्त हा प्रकार खाईच्या कांठावर उभा राहून अवलोकन करीत होता. तिची अत्यंत कींव येऊन त्याचे डोळे भरून आले. तें पाहतांच वासवदत्तेच्यानें स्वस्थ राहावेना. ती हुंदका आवरून ह्मणाली, "महाराज, एकेकाळीं ही सर्व काया कमलाप्रमाणें सुगंधित व सौंदर्य-संपन्न होती. पण आज तीच चुरून टाकलेल्या घाणेरड्या फुलाप्रमाणें येथें पडली आहे. महाराज या दासीला, आपल्या प्रेमाची उत्कंठा होती; पण आपली योग्य वेळ माझ्या दुर्दैवानें दूर होती." उपगुप्त ह्मणाला, "माझी वेळ आतां आल्यानें मी आतां येऊन उभा राहिलों आहें." वासवदत्तेला पुन्हां गहिंवरून येऊन ती ह्मणाली,, "काय महाराज, आतां? आतां वेळ झाली?" उपगुप्त ह्मणाला, "होय आतांच." वासवदत्ता ह्मणाली, "आतां काय उपयोग? तें विषयी प्रेम, त्यासाठीं लागणारें वेड, त्या वेडांत होणारें मनुष्यत्वाचें मातेरें व त्यामुळें हातून घडणारीं पशुतुल्य नीच कृत्यें यांतलें सर्व स्वारस्य माझ्या ध्यानांत येऊन त्याच्याविषयीं माझ्या मनांत अत्यंत चिळस उत्पन्न झाला आहे. आपण तें प्रेम देण्यासाठीं आलां असाल तर तेथूनच परत जा. मला एक निराळें प्रेम उत्पन्न झालें आहे तें जर आपल्यापाशीं असेल तर मला द्या आणि कृतार्थ करा. महाराज, आपण सिद्ध आहां तेव्हां सिद्धांजवळ जें प्रेम असतें तें मला द्या. आपल्या जवळ तें असेल." उपगुप्त ह्मणाला, तें प्रेम घेण्यास तूं सिद्ध आहेस काय?" वासवदत्ता उत्कंठेनें ह्मणाली, "होय होय; मी सिद्ध आहें." उपगुप्त ह्मणाला, "तर मग माझी तयारी आहे. इतके दिवस तूं खरी सिद्ध झाली नव्हतीस म्हणूनच मी थांबलों होतों. माझ्याजवळून तूं भलतेंच प्रेम इच्छीत होतीस पण मला हें प्रेम तुला द्यावयाचें होतें!"

वाचकहो! आतां काय सांगावयाचें राहिलें? उपगुप्तानें तिजवर अनुग्रह केला. भगवान् बुद्धाचा महोपदेश तिला करून तिची मायिक भ्रांति नाहींशी करून टाकली आणि शेवटीं ती कृतार्थ होऊन गेली. अंतर्यामीं लय लागल्यानें शारिरीक यातना तिला मुळींच जाणवतनाशा झाल्या. राहिलेला भोग भोगून पुरा होतांच तिनें आनंदानें देह विसर्जन केला!!

**एक प्रेमी.**

# विरहिणीची मदन निर्भत्सना.

## लेखक—विनयविहारी.

### वृत्त—सवाई.

छल मदना विरही हृदयां तव
होइ असह्य जया न तुला,
तरिहि सुजाण विशेषण लाविती
अर्थ न ज्यांत ' अनंग ' तुला !
नवल ! न अंग असे तरि थोर
पराक्रम हा तव पंचशरा!
प्रखर किती बल साङ्गपणीं तव!
ठाउक एक उमेश हरा ! १

पटत मना न अनंगपणा तव
होय कितीहि विचार तरीः
पवन न काय सदेह फिरे
नयनांस कधींहि दिसे न जरी ?
कितितरि धूर्त अहो जन हे !
निज झांकुनि दृष्टि जडत्व भलें,
ह्मणति 'भुतांस न अंग तसें तुज'
त्यांसह विश्व अजाण झुले ! २

कुसुमशरा ! ( किति सार्थ दुजें
अभिधान बुधें बुधें कवण्या दिधलें !)
उचित असे तुज शूर नरा
बहुतांपरि या छळणें अबले ?
जवळ यदा मम ते प्रियनाथ
सुहृद् दुसरा नव्हता तुजसाः
विरह रिपू मम, मित्र तया
करुनी मज कां छळितोस असा? ३

लपवुनि अंग फुलांमधिं, सोडुनि
सायक, टोंचुनि या हृदया,
परभृत कूजित शब्द कठोर न
बोल गड्या तुज येउं दया,
ह्मणसि 'पुढें करु नीच शिखंडिस,
अर्जुन मारी रिपूस हार'?
रणहरि भीष्म कुठें ? हरिणी
मृदुदेहवती ? मनिं लाज धर ! ४

शिव शिव ! कष्टतसें भलतीच
मनीं धरुनी समजूत खुळी,
धरि नटवेष धनंजय संकटिं
आंचवतां स्वगुणां न मुळीं;
विषय कलंकित शील नरां ललनांसह
संगति आदरुनी,
हरवियलें मदनें नर तेज
तयासह जाय दया निघुनी ! ५

## पतितोद्धारक.

[ प्राणी विकारवश होऊन मृत्यूला भितो; पण वास्तविक पाहतां मृत्यु हा मुळींच भयप्रद नाहीं. उलट मृत्यूला जवळ बाळगल्यानें ईश्वराचें सान्निध्य लाभतें हेंच तत्व या कवितेंत दिसून येईल. प्राण्याला मृत्यूचें हें सांगणें असून प्राण्यावर येथें स्त्रीत्वाचा आरोप केला आहे. ]

### पद.

पतीस विसरुनि सेविसि इतरां, असली तूं नारी ।
मला कां भीसी मग भारी ॥
कुणी तुला मनमुराद नटवी, फससीं तूं त्याला ।
त्यापुढें घोडुनि निज लाला ॥
कुणी चेतवी तुझ्या अंतरीं, मिडुनी चलन मनें ।
चुंबिसि त्याला तूं वदनें ॥
कुणी दाखवी आशा, पडसी पाशामधिं त्याचे ।
घालुनी खीळ पुरी वाचे ॥
चाल ॥ तुज म्हणतो कुणी शहाणी ॥
तूं धरिसी त्याचा पाणी ॥ चाल ॥
खल मातेच्या अशा सुतांना दृढ अनुसरणारी ।
मला कां भीसी मग नारी ॥ १ ॥
मी तव पतिचा स्नेही, रूपें उग्र जरी आहें ।
मदंतर सौम्य तरी राहे ॥
तुझी तुझ्या सत्पतिची ओळख मीच करुनि देतों ।
सुखाच्या शिखरीं तुज नेतों ॥
मम सहवासें दुरितें जळतीं, भूतेंही पळतीं ।
तुझे तुज विलुप्त गुण कळती ॥
चाल ॥ रतगृहिणी ज्या पतिठायीं ॥
नत त्यांच्या मी चिर पायीं ॥ चाल ॥
**पतितोद्धारक** जणुं सोपानाचि असुनी हितकारी ।
मला कां भीसी मग नारी ? ॥ २ ॥

**कोल्हापूर,** —सुमंत.

## सोने पैशाला शेर झालें तर?

तर काय? मग मोहरा, पुतळ्या, गिनी ज्या आज दुर्मिळ आहेत त्या रस्त्यानें लोळूं लागतील. आह्मी आमच्या मुलांना पै पैसा खाऊला देतों तेथें आह्मांला मोहरांची खैरात करतां येईल. सोनें पैशाला शेर मिळूं लागलें तर मग काय हो? ईश्वराच्या दयेचा ओघच उंचबळून जाईल. मनुष्यांच्या रोजच्या व्यवहारांत एकदम क्रांति होईल! पण असें व्हावयाचें ह्मटलें तर सोन्याचे डोंगरच्या डोंगरच सांपडले पाहिजेत. खरोखर, उद्यां जर वर्तमानपत्रांत एकादी अशी बातमी प्रसिद्ध झाली कीं, अमक्या अमक्या देशांत सोन्याच्या डोंगराळ टेंकड्यांची एक भली मोठी रांग सांपडली आहे, तर लोक एकदम आश्चर्यानें थक्क होऊन जातील, नव्हे काय?...

असल्या गोष्टी ह्मणजे निव्वळ शेख महंमदी किंवा थंड्या प्रहरच्या रिकामपणांतल्या शिळपट गप्पाच नव्हेत काय? अशक्य गोष्टींवर विनाकारण कल्पनेचे मनोरे उभारण्यांत अर्थ काय? पण अशक्य तरी कां ह्मणाव्या? पूर्वीं मत्स्येंद्रनाथांच्या वेळीं गोरखनाथांनीं सोन्याचा डोंगर केला होता व विद्यारण्यांच्या वेळीं मोत्यांचा पाऊस पडला होता. ईश्वराच्या दयेचा ओघ केव्हां कोठें कसा वळेल हें काय सांगावें! विचार करण्यासारखा प्रश्न एवढाच कीं असें झालें ह्मणजे काय होईल?

प्रश्न किरकोळ दिसतो, पण अर्थशास्त्रदृष्ट्या त्याचें महत्व फार आहे. सामान्य लोक या प्रश्नाचीं आरंभीं लिहिल्याप्रमाणें उत्तरें देतात; पण वस्तुस्थिति अगदीं उलट आहे. सोनें सवंग झाल्यानें मोठीशीं क्रांति काय होणार? कोळसे आज जे अगदीं सवंग आहेत ते दुर्मिळ व महाग झाल्यानें जी विलक्षण क्रांति घडून येईल तितकी कांहीं सोनें सवंग झाल्यानें खात्रीनें घडून येणार नाहीं. कारण सोनें कितीही सुंदर असलें तरी कोळशाच्या इतकें उपयुक्त नाहीं. सोनें नसलें तर जगाचें कांहीं एक अडणार नाहीं; पण कोळसा नाहींसा झाला तर जगाचे उद्योगधंदेच संपुष्टांत येतील.

आतां ज्यांचीं कोठारें अगर खजिने सोन्यानेंच भरलेले असतील ते मात्र सोनें एकदम सवंग झाल्यानें साफ बसून जातील. सोन्याचे जिन्नस रस्त्यानें लोळूं लागतील व त्यामुळें सोन्याच्या जिनसांवर ज्यांनीं लोकांना कर्जपाणी दिलें असेल तेहि बुडतील. परंतु हा एवढा वर्ग ह्मणजेच कांहीं जग नव्हे. सर्व सामान्य दृष्टीनें कांहीं मोठीशी क्रांति होणार नाहीं.

सोनें ह्मणजे कांहीं परब्रह्म नव्हे किंवा जादूहि नव्हे. आपले परस्पर सौदे करण्याचें तें एक साधन आहे. त्याच्यायोगानें श्रमाची देवघेव करतां येते इतकेंच. कारण ती दुर्मिळ धातु असल्यामुळें किंमतीची इयत्ता ठरविण्यास आयतीच सोइस्कर होते. सोनें सवंग झालें तर दुसऱ्या एकाद्या धातूला मान चढेल दुसरें काय? सोन्याच्या विटांचा ढीग करून त्यावर एकाद्या मनुष्यास जंगलांत बसवून

ठवलं तर त्याला त्या सोन्यापासून काय सुख होणार आहे? त्याला तें खातां येणार नाहीं किंवा त्याचें दुसरें कांहीं करतां येणार नाहीं. खरोखर, सोन्याला किंमतीच्या चिन्हाचें महत्व दिल्यामुळेंच त्याचें लोकांना वाजवीपेक्षां फाजील महत्व वाटत आहे. नाहींतर सोन्यापेक्षांहि अति दुर्मिळ अशा काय दुसऱ्या वस्तू अगर धातू आज अस्तित्वांत नाहींत? पण त्या संपत्तींत गणल्या जात नाहींत. सोनें गणलें जातें म्हणूनच त्याचें महत्व व तें लोकांना तत्वमसि!

सोन्याचे जागोजागीं डोंगर सांपडूं लागले व लोखंडाप्रमाणें तें सुलभसाध्य झालें तर अनेक वस्तू सोन्याच्याच करण्याचा प्रचार वाढेल व पूर्वी सोन्याची एक लंका किंवा द्वारकाच होती व आज लंडन, पारिस, न्यूयार्क असलींच कांहीं तुरळक नगरेंच सोन्याचीं आहेत, त्याऐवजीं सर्वजण सोन्यानें मढून निघूं यांत शंका नाहीं. कारण सोनें आधींच सौंदर्यसंपन्न धातु आहे. मानवजातचि त्याजवर पुरातन प्रीति आहे कांहीं धातु विवक्षित देशांत विवक्षित ठिकाणींच सांपडतात पण सोनें ही अशी धातु नव्हे. ती सर्वत्र पसरलेली आहे. तें खडूंतही सांपडूं शकतें. किमया जांणणारे लोक तर वाटेल तेथें त्याची पैदास करूं शकतात हें सुप्रसिद्धच आहे. पण त्याला महत्व वर सांगितलेल्या कारणामुळेंच.

सोन्यांत जितके गुण आहेत तितके दुसऱ्या कोणत्याही धातूंत नाहींत. एक तर तें अत्यंत लवचीक आणि दुसरें प्रसरणशीलही आहे. एक ग्रेन सोन्याचा पाऊणशें चौरसफुट पत्रा होऊं शकतो. त्याची जाडी किती? तर एका इंचाच्या ३५०,००० व्या भागाइतकीं; त्याच्यांत पारदर्शकपणा येतो, व तार काढली तर ती पांचशें फुट लांब निघूं शकते. तीही बारीक किती तर सुमारें एक सहस्रांश इंच आणि पुन्हां तींत लवचीकपणा किती तर दीडशें पौंड वजन ती तोलूं शकतें! ॲसिड, अल्कली वगैरे सारख्या खरवीत जाणाऱ्या क्षारांचाही सोन्यावर कांहीं एक परिणाम होत नसल्यामुळें तें अनेक उपयोगास येतें. त्यालास्वतःला कधीं गंज चढत नाहीं किंवा तें करवंडूनही जात नाहीं. शिवाय तें साधारण उष्णतेनें सहज वितळतें, त्यामुळें त्यांचीं भांडीं वगैरे सहज होऊं शकतात व त्यांजवर हवेचा मुळींच परिणाम होत नाहीं. वर्णीमध्यें तें उत्तम असल्यामुळें मुलाम्याच्या कामींही त्याचा फार उपयोग होतो. त्याचे सुंदर रंगही होतात. सोन्याच्या वर्खानें आज केवढी गंमत होत आहे हें दिसतेंच आहे. शिवाय फिती, जर, टिकल्या वगैरे गोष्टींत तें मोठें उपयुक्त होतेंच. सोन्यासारखें उपयुक्त सोनेंच. तेव्हां सोनें सवंग झालें व त्याचे डोंगराच्या डोंगर सांपडले तर लोकांना जीवन संरक्षणाचें मोठें साधन होऊन त्यांच्या ऐहिक सौंदर्यांतही भर पडेल. अर्थशास्त्राच्या दृष्टीनें तें पैशाला शेर झालें तरी कांहीं मोठासा फरक किंवा क्रांति होणार नाहीं. गुणाच्या बाबतींत मात्र आज त्याचा जो मान आहे तो तसाच राहील. तथापि 'अतिपरिचयादवज्ञा' या सिद्धांताचा त्याला अनुभव घ्यावा लागेल.

सोन्या.

# प्रेमगीति.*

"Love verses, writ without any real passion,
Are the most nauseous of all conceits"

( चाल--"सुरासुरा जणुं०" )

(१)

**भवभूतीनें श्रीरामाच्या** उत्तरचरितीं निर्मियला ।
तो रस पीतां मनास माझ्या चटका लागुनि राहियला ॥
वानुं किती मी कवीशकृति ती धन्य खरोखर महीतळीं ।
**सीतेसाठीं** रडवी **रामा** मूर्छित पाडी स्थळींस्थळीं ॥
कळस जिथें त्या करुण रसाचा, करुनि स्वकरस्पर्श तिथें ।
उठवी ती तैं **राम** वदे तो 'काय नवल हें होय इथें! ॥
'चंदन पल्लव कीं चंद्राचे कर हे पडले मजवरतीं ।
स्पर्श तुझा हा प्रसाद मूर्तचि घडला मजला प्रिय सुदती!' ॥
वाणीनें या आठवली मम जीवन चरितामधिल कथा ।
उदास भेसुर दिसूं लागलीं चित्रेंही त्या स्मरणपथा ॥
रडूं कोसळे तों मज कोणी ओढी मागें धरुनि कचां ।
दचकुनि सुटण्या वळतां अवचित आयकिलें या मधुर वचां ॥
'सांग कुणीं तुज धरिलें?' वदलें 'मृत्यूनें' मी असें झणीं ।
'मृत्यूनें नच, धरिलें प्रेमें' उत्तर हें मज मिळे क्षणीं ॥

---

*__सूचना__—प्रसिद्ध आंग्ल कवयित्री मिसेस इलिझाबेथ बेरेट ब्राउनिंगकृत "Sonnets from the Portugaese" नामक उत्कृष्ट काव्याच्या आधारें सदर **'प्रेमगीति'** हें काव्य लिहिण्यास आमचे कविमित्र कविमौक्तिक श्री. सुमंत यांनीं सुरवात केली आहे, व त्याचा हा एक नमुना आहे. 'गुणागोविंदचे रसिक वाचकांस हें काव्य पसंत पडून त्यांनीं पत्रद्वारें आपले अभिप्राय कळविल्यास याचा राहिलेला तीन चतुर्थांश भाग पुरा करून तो वाचकांस सादर करण्याचा त्यांचा विचार आहे, तरी वाचकांनीं यासंबंधाचे आपले अभिप्राय जरूर कळवावेत अशी त्यांच्यातर्फे आमची सर्वांस विनंति आहे.

**संपादक, गुणागोविंद.**

(२)

जगदीश्वर तो, वदणारा तूं, वचन सुधापी मी तिसरी ।
कुणीं तिघांविण नायकिली तव गिरा मुळीं या सृष्टिवरी ॥
उत्तर दिधलें मात्र एकव्या परमेशानें अह्मांतुनी ।
दिसेनास मज, शापहता ही दृष्टी गेली विलोपुनी ॥
मरतें मी जरि मृत्यूच्या त्या सत्तेनेंही असह्यशा ।
खचित अमुच्या संयोगाची कधीं न होती अशी दशा ॥
'नकार' बरवा; येवो-आला दुसऱ्या कोणाकडुनी जरी ।
परंतु येतां देवाकडुनी सखया! तो बहु हानि करी ॥
जनकल्लोळें वियुक्त आह्मां केलें नसतें जगामधीं ।
सागरासही मुळींच अथवा साधती न ती कृती कधीं ॥
झंझावातें नच लवतो, कीं अह्मी न पडतों विजेमुळें ।
गिरीहि येते आड, तरी तीं मिळतीं अमुचीं करांगुळें ॥
अंतीं जरि या आकाशाचें अंतर असतें परस्परीं ।
तरी अह्मी दृढ भेटतोंचि त्या अविनाशी परजगांतरीं ॥

(३)

कशांतही जगिं उभयतांची अजि समानता नचि दिसे जरा ।
भिन्न भिन्न गति मति नियती; तो स्वर्ग कुठें ही कुठें धरा!॥
योजक अमुचे देवदूत ते करुनि विलोकन अह्मांप्रती ।
विचित्र तुझिया प्रणयाचें या नवल मानिती मनीं अती ॥
रूपवती गुणवती श्रीमती राज्ञीसम जी स्त्री जगतीं ।
खचित खचित तुज कथितें, आहे पात्र मात्र ती भाग्यवती ॥
सदैव बघती प्रेमें युवती सुलोचना तुज शतावधी ।
तशी नसें मी; कांति न ती या अश्रुधूतही दृष्टिमधीं ॥
गांठुनि मजला तुला काय फल! दीन गायिका मी दुबळी ।
गात बैसलें अंधारीं या स्मशान तरुच्या शीततळीं ॥
तव विजयश्री करील आतां अभिषेक तुझ्या शिरावरी ।
कुदशा माझी तशी मजवरी ढाळिल हिमकण कितीतरी!
एक भाव तो व्हावा अमुचा विपरीत अशा असुनि नडी ।
तरी पाहिजे मृत्युनेंच त्या फोडाया ती मधिल खडी ॥

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब, नारायण पेठ, पुणे

(४)

अमृत मधुर तव काव्य किन्नरा! तूं वाग्देवीकंठमणी ।
काज तुझें तें आज राजगृहिं जा जा गाया तेथ ह्मणीं ॥
गान कोणतें कशी प्रसवते गिरागर्भिणी तुझी सदा ।
देउनि तिकडे लक्ष्य नर्तकी नर्तनिं चुकतिल आत्मपदां ॥
असा असुनि तूं जगद्भ्रामका! भ्रमलासी कां कवीश्वरा!।
खीळ सोड या दाराची, तो विटाळ न तुला मुळीं बरा ॥
स्वैर निरुपम स्वगानरसही सिंचन न करीं ममांगणीं ।
येउनि भानीं ध्यानीं घे 'मी स्थानीं कवण्याच लक्षणीं'॥
पहा जीर्ण हें उटज, राहती उलूकजतुका सदावरी ।
तव वीणेला प्रतिकूला, ती झिल्ली ही कटु रवा करी ॥
विबुधेंद्रा! तूं नको आणखी प्रत्यय पाहूं नको असा ।
ओसाडीचा नको प्रतिध्वनि नको बोलवूं, थांब कसा! ॥
अंतर्वाणी केंविलवाणी हाय! धायशी रडे जरी ।
एकाकी बहु दूर जाउनी गा तिकडे गा सुखें तरी ॥

(५)

खिन्न न होईं; व्यक्त करुनि मी ओतुनि आतां तुझ्या पदीं ।
गांभीर्यें तुज दाखवितें कशि रक्षा मम या जडाहृदीं ।
गुप्तपणें ममठायीं राही दुःखाच्या किति राशि अहा! ॥
वळवुनि अपुली दृष्टि मजकडे पहा पहा तूं यासि पहा ॥
मंदमंद अति रक्तवर्ण हा धुमत राहिला अग्नि कसा!।
धूसरतेमधिं रक्षेच्या या, वडवानल निधिमाजिं जसा ॥
तिरस्कारुनी पायीं अपुल्या तुडविशील तूं यास जरी ।
समूळ याचा विनाश होइल; फार बरें तें टांक परी ॥
परी 'वायु ही रक्षा उडविल' भाव धरुनि हा निजांतरीं ।
वाट बघत मजजवळी बसशिल, फसशिल उलटा पुरा तरी ॥
कीर्तीचा जो मुकुट मिळवुनी धारण करिसी शिरावरी ।
जराहि सखया! तद्रक्षण तो करूं शकेल न खरोखरी ॥
जगीं न दुसरा अग्नि, जयानें जळेल तव कच भार असा ।
ह्मणूनि येथूनि जा जा—जाउनि सत्वरी राहीं दूर कसा ॥

(६)

जा मजपासुनि दूर निघोनी–तरी जाण तूं मनीं असें ।
खचित खचित मी येथुनि पुढतीं तुझिया छाये उभी असें ॥
पृथगायूच्या देहालिवरी या एकटीच मी पहा कधीं ।
निज जीवाची योजनाहि ती न करिन एक क्षणावधी ॥
जो तव हस्तस्पर्श टाळिला तज्ज्ञानाविण ऊर्विवरी ।
रविप्रकाशीं शांतमनें मी नुचलिन हा कर पूर्विपरी ॥
विस्तीर्णस्थल शिक्षा देही वियुक्ततेची अह्मां जरी ।
नाडी चलनासहित तवांतर सोडी ते या ममांतरीं ॥
अशनीं पानीं शयनीं स्वप्नीं करीन मी तव आकलना ।
द्राक्षाची जी तदासवीं ती घेत माधुरी जशि रसना ॥
स्वैकारणें मी करीन आतां स्तुति प्रभूची जधीं जधीं ।
नाम तुझेंही तिजमधींच तें आयकेल तो तधीं तधीं ॥
अश्रू माझ्या लोचनांत या उभे राहतील ज्या समयीं ।
तेव्हां तेही अवलोकिल तो असति आणिले अह्मि उभयीं ॥

( ७ )

मरणद्वारीं असतां मी, जीं हळूच गेलीं गुप्तपणें ।
प्रथम माझिया कानीं पडलीं त्वदंतराचीं तीं चरणें ॥
तोंच अवचित–प्रेमाच्या त्या बद्ध जाहलें पुरी करीं ।
जयें शिकविली क्षणांत मजला आयुष्याची नवी परी ॥
तेणें तेथुनि मनामाधिल या उदासीनता ती हटली ।
दिसूं लागली मन्नयनांला विश्वमुखश्री पालटली ॥
ईशें दिधला विशुद्धिकरणा दैन्यौषधिचा चषक मला ।
पिउनि स्तवितें प्रिया! मधुर तो तव सान्निध्यें मधु गमला ॥
नामें पृथ्वी–स्वर्गांचींही पालटलीं तीं मज असती ।
तेथें अथवा येथें जेथें घडे घडेल त्वद्वसती ॥
तशीच वीणा ही गायन हें आवडलीं जीं काल मला ।
तीं प्रियतर अजि, जाणे गायक देवदूत गणमात्र भला ॥
उमटे यांच्या ध्वनीसवें तव सुंदर सुरुचिर नाम जरी ।
सर्वांहुनिही मन्मनास हीं रुचावीं न कां फार तरी ॥

(८)

काढुनि अपुल्या हृदयखनींचीं रत्नें निरुपम, शुद्ध अती ।
नच कथितां मजजवळी सगळीं आणियलीं तूं सांप्रत तीं ॥
मनस्तटाच्या बाह्यदेशिं या ठेवियलीं ही दाखवुनी ।
घ्यावीं अथवा तशींच तेथें सोडुनि द्यावीं मीं ह्मणुनी ॥
लोकोत्तर तूं असती दाता, उदार किति ही तुझी कृती ।
देऊं अवचित उलट काय तुज ? टिकेल ज्याची चिरस्मृती ॥
अमूल्य तुझिया दानाची ती फेड करीन न मुळीं जरी ।
असें काय मी कठिण मनाची, कृतघ्न कीं या महीवरी ! ।
नाहीं नाहीं तसें न कांहीं; नसे कठिणता मदंतरीं ।
परी पुरी मी गरीब; सारी ईशाचि जाणे स्थिती खरी ॥
सदैव अश्रू गळुनि ते मम वर्ण आयुचे विलोपले ।
शरीर निष्प्रभ जीव रहित हें गाढ अजुनि जरि न झोंपलें ॥
तव शीर्षातें उपधानातें योग्य जराही नसे तरी ।
दूर निघुनि जा ? तुडवुनि जावो शुष्क गलितशा दलापरी ॥

(९)

दुर्मिळशीं तव निश्चय वचनें ऐकुनियां तीं सर्व जरी ।
हास्य येत मज विरळा, तेंही न टिके क्षणभरि या अधरीं ॥
शोकगताब्दें प्रतिशोकीं ही विरक्तवाणी आठवुनी ।
दुःखाश्रु तुजवरी ढाळितिल नयन न धरितिल सांठवुनी ॥
देववेल हें मजकडुनी, तुज द्याया दुसरें काय असे ? ।
उचित मुळीं मम दान नसे, मग देउं कसें ? भय वाटतसे ॥
पति पत्नी हा भाव घडाया समान अमुची न ती स्थिती ।
नको नको तरि नकोचि, होइल कष्टद आह्मांप्रती किती ! ॥
मजसम कंटक दान दायिनी असती ज्या ज्या स्त्रिया जनीं ।
खचित खचित त्या अधम पापिणी खल' गणाव्या न कां मनीं ?
हाहा ! कधिंही आणीन न मी कलंक तव या विमल यशा ।
नाशीन नही मुळीं निजविषें सुधेस तुझिया रुचिर अशा ॥
कोणतेंच कीं प्रेम न देइन, अनय न घेइन तो पदरीं ।
प्रिया अंतरीं मात्र तुजवरी करीन शुद्ध प्रेम परी ॥

( १० )

पर्णकुटी कीं मंदिर जाळो तेजस्वी बहु अग्नि असे ।
जळतां तृण वा चंदनकाष्ठ ज्वालेमधिं सम तेज वसे ॥
प्रेम केवल प्रेम अनलसें सुंदर साचें कितीतरी ! ।
सेवायातें उत्तमही तें स्त्री पुरुषांतें महीवरी ॥
सुविहित समयीं ह्मणें पहा जैं **'तुझ्यावरी मी प्रेम करीं'** ।
प्रतिरूपीं तैं यथादरित तव राहीं दृष्टीपुढें खरी ।
दृष्टिहि ती निजरूप पालटे, दिसती तिजला किरण नवे।
निघुनि माझिया मुखामधुनिया तुझ्याकडे जे वळति जवें ॥
नीच करी जैं प्रेम असें त्या-प्रेमी न मुळीं नीचपणा ।
भक्ताची हो शुद्ध भक्ति जी ईश करा तत्त्वकिरणा ॥
साधारण जें आहे माझें मूळरूप तें मावळुनी ।
धरी दिव्यता अपूर्व आतां मज जगीं हें ये कळुनी ॥
विधिनिर्मित जी ? हीन मूर्ति ती बहु मोलाची होय अशी।
दिसे देहि कीं असे सात्विक प्रेमाची कृति थोर कशी ॥

( ११ )

ह्मणूनि करणें प्रेम असें हा गणिला जाई सुगुण महा ।
नसें नसें मी लेश मात्रही नसें अशोभित खचित अहा ! ॥
पहा पांडुता आली गालीं, कंपहि पायीं किती सदा ।
जड हृदयातें वाहायातें समर्थना ते भिती गदा ॥
नभांत मारी उंच भरारी एके कालीं जें स्वबळें
गायिकायु तें मम हें आतां श्रांत होउनी धैर्य गळे ॥
दरीमधें जो कोकिळ गातो लज्जित त्याला करावया ।
विरणा वाणी उदासवाणी शकते गाणीं ह्मणावया ॥
कशास गोष्टी अशा आठवूं ? प्रिया! दिसे कीं स्पष्ट असें ।
न योग्यतेची तुझ्या मुळीं मी तुला न अथवा पात्र असें ॥
तथापि केवळ निजांतरीं जें प्रेमकरीं मी तुझ्यावरी ।
त्याच प्रेमापासुनि यावें दोषनिवारक कृपा खरी ॥
अचल राहतें प्रेमा मग तें व्यर्थचि आहे सर्वपरी ।
जरी बसवितें सुखशिखरीं तुज समक्ष करितें दूर तरी ॥

* * *

कोल्हापूर, —सुमंत.

सतत पन्नास वर्षांच्या अनुभवानें
उत्तम ठरलेला
( दूषित रक्त शुद्ध करणारा )



# डॉ. वामन गोपाळ

यांचा जगप्रसिद्ध,
आयोडाइज्ड

# सार्सापरिला.

देहाचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां विघडलें कीं नानातऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं



लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारामुळें व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगांमुळें अर्धांग वायु, अवयवें लुलीं पडणें, स्मरण शक्ति कमी होणें, शरिरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधीवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर रोगांवर हाच सार्सापरिला देणें उत्तम होय.

किंमत एक बाटली रु. १। ट. ख. निराळा. चार बाटल्यांस ट. ख. सह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात.

मालक—डॉ. गौतमराव केशव, ठाकुरद्वार, मुंबई नं. २.

प. ग. १९७१


## सचित्र-गुणागोविंद पुस्तकमालेचीं आतांपर्यंत प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें.

१ वसंतलीला.
२ संसारी सावित्री—(उत्कृष्ट स्त्री चरित्र.)
३ उद्योगी सत्यवान—ऊर्फ प्रेमसंसार (संगीत पंचांकी नाटक.)
४ मोरयाचे मोदक.
५ विजयी विजयादशमी—(मनोरंजक व बोधपर कादंबरी.)
६ माझें मनोराज्य—(मनोरंजक कादंबरी उत्कृष्ट स्त्रीस्वभावाचें चित्र)
७ ऐतहासिक देवयानी—(या ऐतिहासिक व मनोरंजक कादंबरींत स्त्रियांच्या खऱ्या कर्तव्याचें दर्शन स्पष्टपणें केलें आहे.)
८ मोहनबाग-भाग १ ला (डिटेक्टिव टेल यांत डिटेक्टिवाच्या चातुर्याचें उत्कृष्ट चित्र वठविलें आहे.)

९ विविध-वाग्विहार.

(निरनिराळ्या कवींचे व लेखकांचे निरनिराळ्या विषयांवर बोधदायक व मनोरंजक लेख व कविता.)

गुणागोविंद-पुस्तकमालेच्या चांगुलपणाबद्दल चांगल्या चांगल्या मंडळीचे उत्तम अभिप्राय मिळाले आहेत. दहाव्या ह्मणजे पुढच्या पुस्तकापासून मालेचें दुसरें वर्ष सुरू होणार. ही पुस्तकमाला मोठमोठ्या सणांवारी आपल्या वाचक वर्गाच्या आनंदांत अधिक अधिक भर घालते. व त्यांस वर्षभर रंजविते. प्रत्येक पुस्तकाची किंमत सहा आणे. पण वर्गणीदारांस सर्व पुस्तकें फक्त अडीच रुपयांतच मिळतात. नवीन वर्गणीदारांनीं त्वरा करावी!

---

## सुमंत कविकृत

मोठमोठ्या रसिक विद्वानांनीं उत्तम अभिप्राय दिलेली आणि डे. व्ह. ट्रान्सलेशन् सोसायटीकडून बक्षीसें मिळालेलीं

पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| मौक्तिक माला | ०।१० | शोकतरंगिणी | ०२ |
| कन्यादानफळ (सचित्र) | ०३ | माझे दुर्दिन | ०२ |

१८१

हीं पुस्तकें एकदम घेणारास टपालखर्चासुद्धां १ रुपयास मिळतील.

पत्ताः—ए. डी. मुरतले, कोल्हापूर सिटी.